# बॅरि. शेषराव वानखेडे ५६ वा वाढदिवस प्रतिष्ठान, नागपूर

द्वारा संचालित

# बॅरि. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय,

खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर

## संचालक समिती

| | | |
|---|---|---|
| १. | मा. कुंदाताई विजयकर | अध्यक्षा |
| २. | मा. श्री. अविनाशजी विजयकर | सचिव |
| ३. | मा. श्री. सुनीलबाबू केदार | सदस्य |
| ४. | मा. श्री. विठ्ठलराव टालाटुले | सदस्य |
| ५. | मा. श्री. अटलबहादूर सिंग | सदस्य |
| ६. | मा. श्रीमती रमोला महाजनी | सदस्य |
| ७. | मा. श्री. यशवंतराव लांडे | सदस्य |
| ८. | मा. कु. अनिता विजयकर | सदस्य |
| ९. | मा. श्रीमती अनुजा केदार | सदस्य |
| १०. | मा. कु. मुक्ता महाजनी | सदस्य |
| ११. | मा. डॉ. पूर्णिमा चिंचमलातपुरे | सदस्य |

## महाविद्यालयीन विकास समिती

| | | |
|---|---|---|
| १. | मा. कुंदाताई विजयकर | अध्यक्षा |
| २. | मा. अविनाशजी विजयकर | सचिव |
| ३. | मा.श्री. मनोहरराव बुटे | सदस्य |
| ४. | मा. श्री. दुलिचंदजी कुंभारे | सदस्य |
| ५. | मा. श्री. रविन्द्रजी चिखले | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. अंजली पांडे | सदस्य |
| ७. | प्रा. डॉ. ज्योती सेलूकर | सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. गजानन सोमकुंवर | सदस्य |
| ९. | प्रा. डॉ. राजेन्द्र राऊत | सदस्य |
| १०. | प्रा. डॉ. संगीता चोरे | सदस्य |
| ११. | प्रा. डॉ. महेन्द्र सहारे | सदस्य |
| १२. | कु. आचल एल. पाटील | सदस्य |
| १३. | श्री. शंकर बहादूरे | सदस्य |
| १४. | प्राचार्य डॉ. आर. जी. टाले | प्राचार्य/सचिव |

# बॅरि. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय,
खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर

## प्राध्यापक वृंद

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. रामकृष्ण टाले | प्राचार्य |
| २. | प्रा. डॉ. अंजली पांडे | मराठी |
| ३. | प्रा. डॉ. ज्योती सेलुकर | समाजशास्त्र |
| ४. | प्रा. डॉ. गजानन सोमकुंवर | अर्थशास्त्र |
| ५. | प्रा. डॉ. राजेन्द्र राऊत | शारीरिक, शिक्षण |
| ६. | प्रा. डॉ. उमेश जनबंधू | इतिहास |
| ७. | प्रा. डॉ. प्रतिभा गडवे | राज्यशास्त्र |
| ८. | प्रा. डॉ. संगीता चोरे | ग्रंथपाल |

## अंशकालीन प्राध्यापक

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. संगीता उमाळे | मराठी |
| २. | प्रा. अभय काकडे | इंग्रजी |
| ३. | प्रा. राजु मस्के | वाणिज्य |
| ४. | प्रा. रवि टोणपे | इंग्रजी |
| ५. | प्रा. विक्की भुरे | वाणिज्य |
| ६. | प्रा. जया फाये | वाणिज्य |
| ७. | प्रा. शिल्पा घाटोळे | फॅशन डिझायनिंग |
| ८. | प्रा. सुरेखा बोरकर | गृहअर्थशास्त्र |
| ९. | | |

## शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शंकर बहादुरे | मुख्य लिपीक |
| २. | श्री. मंगल काकडे | वरिष्ठ लिपीक |
| ३. | श्री. अनिल पराते | कनिष्ठ लिपीक |
| ४. | श्री. अरविंद भड | ग्रंथालय परिचर |
| ५. | श्री. अरूण शिंदुरकर | शिपाई |
| ६. | श्री. गणेश ढोके | शिपाई |
| ७. | श्री. राजेश कठौते | शिपाई |

# प्राचार्यांचे मनोगत

**प्राचार्य**
**डॉ. आर. जी. टाले**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची कवाडे खुली व्हावी, या बाबासाहेब केदारांच्या सामाजिक जाणीवेतून, निसर्गाच्या सान्निध्यात बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय स्थापन झाले व अल्पावधीतच १९९४ साली स्थापन झालेल्या या महाविद्यालयाने ग्रामीण क्षेत्रातील उत्कृष्ठ महाविद्यालय म्हणून नावलौकिक कमावला. केवळ विद्यादानच नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने निरनिराळे उपक्रम महाविद्यालयाद्वारा राबवले जातात. जीवनाच्या विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांना सक्षमतेने कसे उभे राहता येईल याचाच प्रयत्न नेहमी महाविद्यालयाद्वारा होत असतो व आमच्या या प्रयत्नांना महाविद्यालयाच्या अध्यक्षा मा. कुंदाताई विजयकर व महाविद्यालयाचे विश्वस्त मा. सुनीलबाबू केदार यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभते. म्हणूनच ग्रामीण भागातील असूनही आज महाविद्यालयाला नॅक प्रमाणित 'ब' दर्जा लाभला आहे. महाविद्यालयातील निरनिराळे विभाग अध्यापनाबरोबर विविध विद्यार्थीभिमुख उपक्रमांचे आयोजन करून त्यांना कृतीप्रवण ठेवण्यात आपले लक्ष केंद्रित करतात. एवढेच नव्हे, तर नियमित शिक्षण घेण्यापासून वंचित राहिलेल्या, परंतु शिकण्याची जिद्द असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या परिघात आणण्यासाठी महाविद्यालयाद्वारा नुकतेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ केंद्र सुरू करून त्यांची शिक्षणाची अभिलाषा पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सत्र २०१९ ते २0२0 या काळात कोरोनाच्या भयावह परिस्थितीवर मात करत महाविद्यालयाने आभासी पद्धतीने शिक्षणाचे कार्य चालू ठेवून विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होऊ दिले नाही व याचीच प्रचिती म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थी असूनही या कालखंडात विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तम गुण प्राप्त केले. आजच्या या स्पर्धेच्या युगात नवीन आव्हाने पेलून विद्यार्थ्यांना भक्कमपणे पाय रोवून उभे राहता यावे व बाहेरच्या जगाशी येथील विद्यार्थी समायोजित व्हावा, हा दृष्टिकोन ठेवून महाविद्यालय कार्यरत आहे.

सत्र २०२०-२१ या वर्षात परिस्थितीत फारशी सुधारणा ही नव्हतीच, केवळ उणेपुरे १-२ महिन्याचा प्रत्यक्ष शिक्षणाचा कालावधी सोडल्यास कोरोना परिस्थितीवर मात करीत आभासी शिक्षणासोबत प्रत्यक्ष शिक्षण विद्यार्थ्यांना देऊन निरनिराळे व्यक्तिमत्त्व विकास पूरक उपक्रम राबविण्यात आले. त्यातीलच एक आविष्कार म्हणजे महाविद्यालयाचा वार्षिकांक होय. नुकतेच महाविद्यालयाचे रौप्य महोत्सवी वर्ष पार पडले. त्यानिमित्त्याने भविष्यात महाविद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी प्रगतिपथावर नेण्याचा वसा आम्ही घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याला उत्कृष्ठ घडविण्याचा मानस पुढे ठेऊन आम्ही पुढील वाटचालीस आज कटिबद्ध आहोत व यात आमचा विद्यार्थी आम्हास भक्कम साथ देत आहे. म्हणून आम्हास म्हणावेसे वाटते

"यशोशिखरे आम्हास फार दूर नाही हेच खरे."

***

# संपादकीय

**संपादिका**
**प्रा.डॉ. प्रतिभा गडवे-दातीर**

"कुसुमगंध"चा महाविद्यालयातील हा सतरावा वार्षिकांक रसिकांच्या सुपूर्द करतांना आम्हाला अत्याधिक हर्ष होत आहे.

महाविद्यालयाच्या उभारणीसाठी अनेकांनी घेतलेले परिश्रम आणि योगदानातून महाविद्यालयाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने काढलेल्या मा. बाबासाहेब केदार यांच्या स्वप्नाला मूर्तरूप मिळाले आहे व १९९४ साली महाविद्यालयाच्या रूपाने लावलेली ही विद्यावेल आज गगनावरी जाऊ पहात आहे. कर्तृत्व व नेतृत्व या दोन्ही गुणाचा वारसा लाभलेल्या या महाविद्यालयाने ग्रामीण भागातील उत्कृष्ठ महाविद्यालय म्हणून सावनेर जिल्ह्याच्या पंचक्रोशीत नाव कमावले आहे. विद्यार्थ्यांच्या सृजन शक्तीला वाव मिळावा म्हणून महाविद्यालयाने कुसुमगंध वार्षिकांकाला प्रकाशित करून विद्यार्थी लेखणीला व्यासपीठ उपलब्ध करून दिले व प्रत्येक वर्षीच विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यपूर्ण लेखणीने आपल्या भावभावनांचे स्पंदन कथा, कवितांच्या माध्यमातून व्यक्त करून एक सर्वांगसुंदर साहित्य प्रतिकृती आम्हास उपलब्ध करून दिली.

आमच्या विद्यमान संस्थाध्यक्षा मा. कुंदाताई विजयकर यांचे आशीर्वाद, मा. सुनीलबाबू केदार यांचे प्रोत्साहन, प्राचार्य डॉ. आर.जी. टाले यांचे मार्गदर्शन, सहसंपादकांचे सहकार्य व विद्यार्थ्यांचा सृजनशील प्रतिसाद यामुळे "कुसुमगंध"चा हा अंक पूर्णत्वास आला. या सर्वांचे ऋणाईत होणेच मला अधिक आवडेल.

आमचं स्वप्न होतं या सर्वांगसुंदर वार्षिकांकात विद्यार्थ्यांचे साहित्य कर्तृत्वरूपी कुसुमगंधने फुलविण्याचा ! देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना, महाविद्यालयाचा यावर्षीचा वार्षिकांक कुठेतरी त्याच्या समीप जाणारा असावा हे लक्षात घेऊन वर्षविशेष लेखन आपल्याकडून व्हावे असा प्रयत्न आमच्या विद्यार्थ्यांनी केला व आपल्या विचारांना कौशल्यपूर्ण लेखणीने मूर्तरूप दिले. आपल्या भावना मौक्तिकांना शब्दांचे कोंदण दिले. तेच आम्ही आपल्यासमोर सादर करीत आहोत. यावर्षीच्या कुसुमगंधात नियमित विद्यार्थ्यांबरोबर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची लेखसंपदा देखील आम्ही सामील केली.

या कुसुमगंधातील भावनारूपी सुकुमारता व परिश्रमरूपी सुगंधाची दरवळ लेख, कवितांच्या माध्यमातून हृदयाला स्पर्शून जाणारी आहे. कुसुमगंधाच्या अंतरंगात वसंत बापट जन्मशताब्दी वर्ष, शांता, शेळके जन्मशताब्दी वर्ष, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर-एक आदरांजली, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव , समानतेसाठी लढा, युद्ध नको बुद्ध हवा, जागतिक पर्यावरण दिवस, माझे बाबा, खरे जीवन, शिक्षणाची खरी किंमत यासारखी लेखसुमने तर माय मराठी, कुणीतरी असावं, आठवणी, ऑनलाइन शिक्षा, आई, मुलगी आहे म्हणून का ? नीतीसार, काश मी फुलपाखरू असते, मन, आनंद, ईश्वर दो ऐसा वरदान यासारखी पद्य सुमने लेखनरूपी सुगंधाच्या दरवळीची प्रचिती देतात.

सोबतच महाविद्यालयाच्या शैक्षणिक विभागासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व

विकासासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगार विभाग, महिला सेल इत्यादी विभागांचे कार्यही उल्लेखनीय असल्यामुळे त्यांच्या कार्यावरही थोडक्यात प्रकाश टाकण्यात आला आहे.

शिक्षण, साहित्याबरोबरच आमचे विद्यार्थी समाजाभिमुख वर्तन करतात. विद्यापीठस्तरीय, राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये व क्रीडांमध्ये उल्लेखनीय कार्य केलेल्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची दखल इथे घेतलेली आहे. शिवाय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांनिमित्त्य राज्यशास्त्र विभागाद्वारा आयोजित “राष्ट्रनिर्मितीत स्त्रियांचा सहभाग” या विषयावरील आयोजित राज्यस्तरीय आंतर्विद्यापीठीय निबंध स्पर्धेत पुरस्कार प्राप्त प्रथम तीन क्रमांकाच्या निबंधाचा समावेश यावर्षी केलेला आहे. इतर विद्यार्थी यापासून प्रेरणा घेऊन यशप्राप्तीसाठी प्रयत्न करतील ही यामागची भूमिका आहे.

विद्यार्थी, प्राचार्य, सर्व प्राध्यापक आणि संपादक मंडळातील सदस्यांच्या सहकार्याने असा हा सर्वांग सुंदर “कुसुमगंध” आकारास आणणे शक्य झाले. ज्यांनी यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केले, अशा सर्वांच्या ऋणात राहून या संपादकीयला मी पूर्णविराम देते.

धन्यवाद !

***

# अनुक्रमणिका


**गद्य विभाग**

| | | |
|---|---|---|
| १. | वसंत बापट जन्मशताब्दी वर्ष २०२१ | १ |
| २. | शांता शेळके जन्मशताब्दी वर्ष २०२१–२०२२ | ३ |
| ३. | स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर (आदरांजली) | ५ |
| ४. | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | ६ |
| ५. | समानतेसाठी लढा | ८ |
| ६. | युद्ध नको बुद्ध हवा | १० |
| ७. | जागतिक पर्यावरण दिवस | १२ |
| ८. | माझे बाबा | १४ |
| ९. | खरे जीवन | १७ |
| १०. | शिक्षणाची खरी किंमत | १९ |

**पद्य विभाग**

| | | |
|---|---|---|
| १. | माय मराठी | २१ |
| २. | आठवणी | |
| ३. | कुणीतरी असावं | २२ |
| ४. | नीती सार | |
| ५. | ऑनलाइन शिक्षा | २३ |
| ६. | ईश्वर दो ऐसा वरदान | |
| ७. | आई | २४ |
| ८. | काश मी फुलपाखरू असते | २५ |
| ९. | आनंद | |
| १०. | मुलगी आहे म्हणून का ? | २६ |
| ११. | मन | |
| १२. | निर्णय | २७ |

**विभागीय अहवाल**

| | | |
|---|---|---|
| १. | मराठी विभाग | २८ |
| २. | राज्यशास्त्र विभाग | २९ |
| ३. | अर्थशास्त्र विभाग | ३१ |
| ४. | इतिहास विभाग | ३३ |
| ५. | शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग अहवाल | ३४ |
| ६. | ग्रंथालय विभाग अहवाल | ३५ |
| ७. | सांस्कृतिक विभाग | ३९ |
| ८. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग | ४१ |
| ९. | स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगार विभाग | ४२ |
| १०. | महिला सुरक्षा विभाग | ४३ |

**राज्यस्तरीय आंतरविद्यापिठीय निबंध स्पर्धेतील पुरस्कारप्राप्त निबंध**
**विषय - राष्ट्रनिर्मितीत स्त्रियांचा सहभाग**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रथम पुरस्कारप्राप्त | ४३ |
| २. | द्वितीय पुरस्कारप्राप्त | ४९ |
| ३. | तृतीय पुरस्कारप्राप्त | ५३ |

# गद्य विभाग

# वसंत बापट जन्मशताब्दी वर्ष २०२१-२२

कुंदन कुर्वे
एम.ए. भाग १

प्रा. बापट यांचा जन्म २५ जुलै १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड येथे झाला तर शिक्षण पुण्यात झाले. त्यानंतर मुंबईतील नॅशनल कॉलेज आणि रामनारायण रुईया कॉलेज ह्या महाविद्यालयांत मराठी आणि संस्कृत ह्या विषयांचे प्राध्यापक होते. काही काळ मुंबई विद्यापीठातील गुरुदेव टागोर अध्यासनाचे प्राध्यापक होते. साहित्य अकादमीचे सदस्य होते. प्रा. बापट हे स्वातंत्र्य चळवळीतही सहभागी झाले होते. जवळपास पंचवीस वर्षे ते मुंबई विद्यापीठात प्राध्यापक होते. १९७२ साली मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. वसंत बापट इ.स. १९८३ ते इ.स. १९८८ या काळात साधना नियतकालिकाचे संपादक होते.



लहानपणापासून बापटांवर राष्ट्रसेवा दलाचे आणि साने गुरुजींच्या सहवासाचे संस्कार झाले. शेवटपर्यंत ते राष्ट्रसेवा दलाशी संलग्न होते. बिजली ह्या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहावर ह्या संस्कारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. अकरावी दिशा सकीना आणि मानसी हे त्याचे बिजलीनंतर प्रकाशित झालेले काव्यसंग्रह होय. सामाजिक विषमता आणि अन्याय ह्यांच्या तीव्र जाणिवेबरोबरच यौवन, निसर्ग सौंदर्याची अभिव्यक्ती या बरोबरच लावणीसारखा काव्यप्रकारही हाताळला. त्यांनी लहान मुलांसाठीही कविता लिहिल्या.

जनजागृती करणे हेही कवितेचे एक महत्त्वाचे कार्य आहे, असे बापट मानत असल्यामुळे राष्ट्रीय संकटाच्या, दुःखाच्या वा देशातील विविध जन-आंदोलनाच्या प्रसंगी त्यांनी आपली संवेदनशील प्रतिक्रिया आपल्या कवितेतून व्यक्तविली आहे. उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू ही त्यांची गाजलेली कविता किंवा त्यांनी रचिलेला संयुक्त महाराष्ट्राचा पोवाडा ही त्याची काही उल्लेखनीय उदाहरणे होत.

बिजली, सेतू, अकरावी दिशा, सकीना, मानसी, शिंग फुंकिले रणी, शूरमर्दाचा पोवाडा, तेजसी, राजसी, प्रवासाच्या कविता प्रसिद्ध आहेत. सामाजिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक विषयांवर महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर त्यांची व्याख्याने झाली. स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वाचे कवी म्हणून प्रसिद्ध असलेल्या वसंत बापट यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते. कवी, ललित

गद्यलेखक, प्रवासवर्णनकार, गीतकार, स्वातंत्र्यशाहीर, स्वातंत्र्यसैनिक, वक्ता, प्राध्यापक, अभिनेता, पत्रकार, संपादक, राष्ट्रसेवा दलाच्या कलापथकाचा संस्थापक-संवर्धक, कार्यक्रमाचे सूत्रसंचालक-निवेदक या नात्यांनी परिचित असलेल्या वसंत बापट यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे.

सामाजिक आणि राष्ट्रीय आंदोलनाच्या काळात समाजात जागृती निर्माण व्हावी म्हणून त्यांनी काव्य-लेखन केले. राष्ट्रीय गीते, स्फूर्तिगीते, पोवाडे, राष्ट्रीय तमाशा, वगनाट्ये यांसारखे लेखन त्यांनी प्रारंभीच्या काळात केले... त्यांच्या कवितेवर समाजवादी विचारधारेचा प्रभाव आहे. त्यांच्या कवितेत सामाजिक जिव्हाळा, सामाजिक समता, माणसाबद्दलचे प्रेम, मानवतावाद, आशावाद यांचे दर्शन घडते. मानवतावाद, प्रेम यांची आकांक्षा बाळगणारा हा कवी अन्याय, विषमता, दांभिकता, ढोंगीपणा यांचे उपरोधपूर्ण चित्रण करतो.

सेतू ह्या काव्यसंग्रहास व लहान मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या बाल-गोविंद (१९६५) ह्या नाटकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभला. संगीत, अभिनय, लोककला ह्यांची उत्तम जाण बापटांच्या ठायी आहे. राष्ट्रसेवा दलातर्फे त्यांनी सादर केलेल्या महाराष्ट्र दर्शन, भारत दर्शन ह्यांसारख्या यशस्वी कार्यक्रमातून तिचा प्रत्यय येतो.

बापटांची राष्ट्रीय जाणिवेची कविता अधिक प्रभावी असून ती सामाजिक रूप घेऊन अवतरते. प्रणयभावनेचे अनेकविध रंग त्यांच्या कवितेत आविष्कृत झाले आहेत. त्यांच्या कवितेत विवाहपूर्ण आणि विवाहबाह्य प्रणयाचे चित्रण झाले आहे. त्यांनी लिहिलेल्या लावण्या श्रृंगारिक, नखरेल, मनोरंजनात्मक असून भावनेतील उत्कटता आणि मुक्तपणा हे तिचे ठळक विशेष आहेत. बापटांच्या कवितेतील निसर्गचित्रण किंवा निसर्गरूपे पारंपारिक मराठी कवितेतील निसर्गरू पापेक्षा वेगळी आहेत. बापटांची कविता ही समूहमनाची कविता आहे. तिचे आवाहन साऱ्या समाजाला, अखिल मानवजातीला असते. त्यामुळे आयुष्याच्या अखेरपर्यंत बापटांच्या कवितेत सामान्यांच्या, शोषितांच्या परिवर्तनाचा ध्यास प्रकटत राहिला.

अशा समाजबांधिलकी जपणाऱ्या, उक्ती-कृतीच्या आणि लेखणीच्या माध्यमातून राष्ट्रप्रेमाची ज्योत प्रज्ज्वलित करणाऱ्या वसंत बापट यांना त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्रिवार वंदन !

*****



# शांता शेळके जन्मशताब्दी वर्ष २०२१–२२

कु. प्राची सँडल
बी.ए. भाग ३

शांता शेळके यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ साली पुणे जिल्ह्यातील इंदापूर गावी झाला व शिक्षण पुण्यात झाले. खेड, मंचर या परिसरात त्यांचे बालपण व्यतीत झाले. शांताबाईंचे आजोबा अण्णा हे शाळामास्तर होते. शांताबाईंचे वडिल रेंज फॉरेस्ट ऑफिसर होते. त्यांच्या बदलीच्या नोकरीमुळे चिखलदरा, नांदगाव, खर्डी या गावातही त्यांना वास्तव्य करावे लागते. एकूण ही पाच भावंडे त्यात शांताबाई सगळ्यात मोठ्या. लहानपणी आजोळी गेल्यावर विविध पारंपारिक गीते, ओव्या, श्लोक त्याच्या कानावर पडत. त्यामुळे कवितेची आवड, वाचनाची आवड, त्या संस्कारक्षम वयात रूजत गेली. शांताबाईंच्या वडिलांचे निधन झाले त्यावेळी त्या नऊ वर्षांच्या होत्या. चौथीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले होते. त्यानंतर सारेजण पुण्याला काकांकडे आली. अखेर पुढील शालेय शिक्षण पुण्याच्या हुजुरपागेत झाले. सुसंस्कृत सुविद्य, अभिजात अशा या शाळेतील वातावरणाचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. १९३८ मध्ये त्या मॅट्रीक झाल्या आणि पुण्याच्या स.प. महाविद्यालयातून बी.ए. झाल्या. महाविद्यालयात शिकविणाऱ्या प्राध्यापकांमुळे अभ्यासाच्या पुस्तकाव्यतिरिक्त अवांतर वाचनाची, कवितेची गोडीही वाढत राहिली. या काळात साहित्याचे सखोल संस्कार त्यांच्यावर झाले. अनेक साहित्याविषयक गोष्टी त्यांना इथे शिकायला मिळाल्या. नागपूरचे हिस्लॉप कॉलेज, मुंबईचे रुईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयात त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

कविता, गीत, चित्रपटगीत, कथा, कादंबरी, बालसाहित्य अशा विविध साहित्यप्रकारात शांताबाईंची जवळपास शंभर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वर्षा (१९४७) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर अनेक काव्यसंग्रहाबरोबरच, चित्रपट गीत लेखन, नाट्यगीत लेखन, कवितालेखन, ललित लेखन असे विविधांगी लेखन त्यांनी केले आहे. अनुवादक, समीक्षा–स्तंभ लेखिका, वृत्तपत्र सहसंपादिका म्हणूनही शांता शेळके यांनी साहित्यात मोलाची भर घातली आहे. शांता शेळके या केंद्रीय फिल्म मंडळाच्या तसेच राज्य नाट्य परिषद मंडळाच्या सदस्य होत्या.

विविध साहित्यप्रकारात लेखन करूनही त्यांचे पहिलं आणि खरं प्रेम राहिलं ते कवितेवरच. भावकवितेपासून नाट्यगीते, भक्तीगीते, कोळीगीते, बालगीते, चित्रपटगीते, प्रासंगिक गीते अशा विविध प्रकारातून त्यांनी काव्यलेखन केले. 'रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यांनी' यासारखी लावणी लिहिणाऱ्या शांताबाई – या मराठीतील पहिल्या स्त्री लावणीकार होत.

हृदयनाथ मंगेशकरांनी त्यांच्या अनेक गीतांना चाली दिल्या. हृदयनाथ मंगेशकरांनी संगीत दिलेली त्यांची गाजलेली लोकप्रिय गीते म्हणजे वादळवारं सुटलं गं, वल्हव रे नखवा, राजा सारंगा, राजा सारंगा ही होत. जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत दिलेल्या वासवदत्ता आणि हे बंध रेशमांचे या दोन्ही नाटकांसाठी शांताबाईंनी गाणी लिहिली. अशाप्रकारे कवितेच्या विविध रूपात, विविध लेखनप्रकारात त्या रमलेल्या होत्या. संतांच्या काव्यातील सात्विकता, पंडितांच्या काव्यातील विद्वत्ता आणि शाहिराच्या काव्यातील ललितमधुरता शांता शेळके यांच्या कवितेत आढळते.

लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य हा त्यांचा आवडीचा विषय. लोकसाहित्य म्हणजे महाराष्ट्राचं जनजीवन, ग्रामीण माणसाचं वास्तव दर्शन – साधं, सरळ, भाबडं; पण कारुण्यानं ओथंबलेलं. असं हे लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती शांता शेळकेंच्या साहित्याचा मूळ आधार आहे. शांता शेळके यांच्यावर खेड्यातल्या मुक्त वातावरणाचे संस्कार झाले असल्यामुळेच की काय, त्यांच्या गाण्यातील शब्द स्त्री गीतातील मार्दव ठेवून येतात. स्त्रीमनाच्या भावनांचा वेध घेणारी शांता शेळके यांची अनेक गाणी आहेत. पैठणी या कवितेतून आजीने तिच्या लग्नात नेसलेली पैठणी अजूनही जीवापाड जपून ठेवली असल्याचे कवयित्री सांगते. या पैठणीच्या स्पर्शातून तिला मायेची ऊब मिळते. आपल्या आजीच्या वात्सल्याबरोबरच आजीच्या पैठणीविषयी वाटणारा जिव्हाळा व स्नेह व्यक्त झाला आहे.

कधीतरी ही पैठणी
मी धरते ऊरी कवळून
मऊ रेशमी स्पर्शामध्ये
आजी भेटते मला जवळून
मधली वर्षे गळून पडतात
कालपटाचा जुळतो धागा
पैठणीच्या चौकड्याने
आजीला माझ्या कुशल सांगा

ऋतू हिरवा या त्यांच्या कवितेतील ऋतूचा श्रृंगार आणि प्रणयाचा श्रृंगार अभिव्यक्त करणारी ही कविता श्रावणाचे सौंदर्य आणि त्याच्या ओल्या हिरवेपणातून हृदयावर सरसरणारा मधु शिरवा, आकाशाची मधुगंध तरल हवा, प्रणयाची भावनेची उत्कटता आणि अधिरता व्यक्त करणाऱ्या या ओळी

ऋतु हिरवा ऋतु बरवा, पाचूचा वनी रुजवा
युग विरही हृदयांवर सरसरतो मधु शिरवा
भिजुनी उन्हे चमचमती, क्षण दिपती क्षण लपती
नितळ निळ्या अवकाशी मधुगंधी तरल हवा
मनभावन हा श्रावण, प्रियसाजण हा श्रावण
भिजवी तन, भिजवी मन हा श्रावण
थरथरत्या अधरांवर प्रणयी संकेत नवा

सौंदर्यदृष्टी, रसिकता, मानवी मनोभूमिका आणि सहजता ही शांता शेळके यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये होत. अवतीभवती सामाजिक, सांस्कृतिक अनुबंधाचा पुरस्कार त्यांनी याच सौंदर्यदृष्टीतून आणि सहजतेतून केला आहे. डेक्कन बालमित्र मंडळाचा यशवंतराव चव्हाण पुरस्कार (१९८८). कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचा कुसुमाग्रज पुरस्कार (१९९१). ग.दि. माडगुळकर पुरस्कार (१९९४) इत्यादी पुरस्कार त्यांना लाभले आहेत. त्याबरोबरच १९९६ मध्ये आळंदी येथे भरलेल्या ६९ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले. कवयित्री शांता शेळके यांचे २०२१–२२ हे जन्मशताब्दी वर्ष आहे. काव्यदेवतेची आराधना करणाऱ्या या शांता शेळके यांना आमचा मानाचा मुजरा !

***



# स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर

**शैलेश डोंगरे**
**एम.ए. मराठी भाग १**

साहित्य, संगीत आणि अन्य कला माणसाचं जीवन समृद्ध करणाऱ्या कला आहेत. आपल्या संगीत साधनेनं रसिकांच्या जीवनात आनंद निर्माण करणारे संगीत क्षेत्रातील अजरामर नाव म्हणजे लता मंगेशकर हे होय. भारतातच नव्हे तर जगभरात आपल्या आवाजाची मोहिनी घालणाऱ्या लता मंगेशकरांचे आयुष्य संघर्षपूर्ण होते. गायन क्षेत्राबरोबरच संगीतकार म्हणूनही त्यांचा नावलौकिक होता. शास्त्रीय संगीतापासून सुरू झालेल्या त्यांच्या गायनप्रवासात उपशास्त्रीय गीत-संगीत, चित्रपट गीत, भावगीत, नाट्यगीत, लोकगीत, गझल, लावणी अशा सर्व प्रकारांची गाणी गायिली. सुरवातीच्या काळात काही चित्रपटात त्यांनी अभिनयही केला. अशा या बहुआयामी संगीत साधिकेचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ मध्ये मध्यप्रदेशातील इंदूर या शहरात झाला.

लता मंगेशकर यांच्या वडिलांचे नाव पंडित दीनानाथ मंगेशकर असे असून ते एक प्रसिद्ध शास्त्रीय गायक व नाट्यकलावंत होते. त्यांच्या आईचे नाव शेवंती असे होते. लता मंगेशकर ह्यांना आशा, उषा व मीना या तीन बहिणी असून हृदयनाथ मंगेशकर हे एक भाऊ अशी त्यांच्या भावंडांची नावे आहेत. लता मंगेशकर ह्या सर्व भावंडांमध्ये सर्वात मोठ्या होत्या. म्हणून सगळे त्यांना लता दीदी अशी हाक मारत. पुढे जाऊन त्यांचे लता दीदी हे नाव फार प्रसिद्ध झाले.

लताला पहिले संगीताचे धडे आपल्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल-कलाकार म्हणून कामाची सुरुवात केली. संगीत क्षेत्रातील अलौकिक स्वरांनी त्यांनी जगाला मोहिनी घातली. त्यांच्या आवाजाने अनेक गाणी अजरामर झाली. त्यांचे बालपण सांगलीत गेले. सांगली येथे दीनानाथ मंगेशकर यांना मास्टर ही पदवी प्राप्त झाली. लतादीदी सांगलीतील सरकारी शाळेत आपल्या लहान भावंडांसह शिकायला जात असत.

आपल्या वडिलांकडून आपल्या भावंडांसमवेत त्या शास्त्रीय संगीत शिकत असत. वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी या स्वरसम्राज्ञीने शास्त्रीय संगीताची मैफिल सजविली होती. लहानपणापासून संगीतात आवड असल्याने लताजींनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण उस्ताद अमानत खान, बड़े गुलाम अली खाँ, पंडित तुलसीदास शर्मा व अमानत खान यांच्याकडून घेतले होते. त्यावेळी लताजी के.एल. सहगल यांच्या संगीताने फार प्रभावित होत्या.

लता मंगेशकर यांच्यावर त्यावेळी दुःखाचा डोंगर कोसळला ज्यावेळी त्यांच्या वडिलांना हृदयविकाराने ग्रासले आणि आपला परिवार सोडून ते ईहलोकीच्या यात्रेला निघून गेले. त्या सुमारास लता केवळ १३ वर्षांच्या होत्या. कुटुंबात त्याच मोठ्या असल्याने आपल्या बहिण भावंडांची जबाबदारी त्यांच्यावर आली. परिणामी लताजींनी बालवयातच आपल्या परिवाराच्या भरणपोषणाकरता काम करणे सुरू केले.

वयाच्या १३ व्या वर्षी लतादीदींनी आपल्या करियरला सुरुवात केली आणि तेव्हापासून आजतागायत आपला सुमधूर आवाज त्या भारतीय सिनेमाला देत आहेत. नवयुग फिल्म कंपनीचे मालक आणि लतादीदींच्या वडिलांचे मित्र मास्टर विनायक यांनी दिनानाथ मंगेशकरांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या कुटूंबात सावरण्यास आणि लता मंगेशकरांना एक गायिका बनवण्यात मदत केली. मास्टर विनायक यांनी लताला १९४२ साली मराठी चित्रपट पहिली मंगळागौर या चित्रपटात एक छोटीशी भूमिकादेखील दिली होती. लता मंगेशकर ह्या भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील एक प्रसिद्ध गायिका होत्या. त्यांच्या गायनाची कारकीर्द इ.स.१९४२ मध्ये सुरू झाली व त्यांनी पहिले पार्श्वगायन हे पहिली मंगळागौर ह्या मराठी चित्रपटासाठी केले होते.

अनेक चढउतारांचा सामना करत लताजी अनेक संघर्षांना आजवर सामोऱ्या गेल्या आहेत. परंतु त्यांनी कधीही हार मानली नाही. निरंतर आपल्या ध्येयाला प्राप्त करण्याकरता पुढे जात राहिल्या. जीवनात मिळणाऱ्या सन्मानाचा आदरपूर्वक स्वीकार केला. आज लताजी सगळ्यांकरताच आदर्श आहेत आणि त्यांचे जीवन कित्येक लोकांकरता प्रेरणादायक आहे.

लता मंगेशकरांच्या कारकीर्दीला एक महत्त्वाचे वळण देणारे गाणे ठरले ते म्हणजेच इ.स. १९४९ साली आलेला लोकप्रिय महल ह्या चित्रपटातील आयेगा आनेवाला हे गाणे होते. इ.स. १९६० च्या दशकात लता मंगेशकर या हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रथम श्रेणीतील गायिका ठरल्या होत्या. याच काळातील लोकप्रिय झालेल्या मुगल-ए-आजम या चित्रपटातील जब प्यार किया तो डरना क्या हे त्यांनी गायिलेले हे गाणे त्याकाळी तुफान लोकप्रिय ठरले होते.

२७ जून १९६३ मध्ये भारत-चीन युद्धानंतर एका कार्यक्रमात लता दीदींनी कवी प्रदिप यांनी लिहिलेले व सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेले 'ए मेरे वतन के लोगो' हे देशभक्तीपर गीत भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या उपस्थितीत गायले. त्यावेळी लतादीदींच्या सुमधूर आवाजातून देशासाठी प्राण देणाऱ्या भारतीय जवानांना श्रद्धांजली वाहणारे ते गीत ऐकून पंडितजींच्या डोळ्यात अश्रू आले होते.

स्वर कोकिळा लता मंगेशकर भारताच्याच नाही तर अखिल विश्वातील सर्वात सुप्रसिद्ध आणि अूमोल अशा गायिका आहेत. त्यांच्या आवाजाची किमया केवळ भारतीयांमध्ये नव्हे तर विदेशातील नागरिकांवर देखील आजतागायत पसरलेली आपल्याला दिसते. आपल्या सबंध कारकीर्दित आजतागायत लतादीदींनी १००० पेक्षा जास्त हिंदी चित्रपटांमध्ये व जवळजवळ ३६ पेक्षा जास्त प्रादेशिक भाषांमध्ये गाणी गायिली आहेत. यासोबतच लतादीदींनी अनेक विदेशी भाषांमध्ये देखील गायन केलेलं आहे.

लता मंगेशकर यांच्या द्वारे संगीत क्षेत्रात दिल्या गेलेल्या अभूतपूर्व योगदानाकरिता त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. १९८९ साली भारत सरकारद्वारे लतादीदींच्या भारतीय सिनेमातील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. लता मंगेशकर एम.एस.सुब्बुलक्ष्मी यांच्यानंतर दुसऱ्या अशा गायिका आहेत ज्यांना भारताचा सर्वोच्च सन्मान भारतरत्न देऊन गौरव करणात आला.....

लाखो रसिकांच्या मनावर आपल्या आवाजाची मोहिनी घालणाऱ्या आणि रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या गानसम्राज्ञीला वयाच्या ९२ व्या वर्षी कोरोना व न्युमोनियाच्या एकत्र आलेल्या आजाराने ६ फेब्रुवारी २०२० रोजी देवाज्ञा झाली. या गान तपस्विनीला आमचे विनम्र अभिवादन.

*****

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**अंकिता हरिदास पाटील**
**(एम.ए. भाग १)**

इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले. आपल्या अनेक पिढ्या न पिढ्या इंग्रजांच्या गुलामगिरीत गेल्या ईस्ट इंडिया कंपनीद्वारे भारतात व्यापार करण्याच्या उद्देशाने इंग्रजांनी भारतात पाऊल ठेवले. पण भारतातील लोक अतिशय भोळे असल्याने त्यांचा फायदा घेऊन या भारतभूमीवर त्यांनी आपले वर्चस्व स्थापन केले आणि भारत देशाला गुलाम बनविले. या गुलामीतून मुक्त होण्यासाठी भारतात अनेक क्रांतीवीर फासावर चढले, अनेक सुधारकांनी बंड पुकारले, एकतर मृत्यू नाहीतर स्वातंत्र्य असा त्यांचा हट्ट होता. पण काही फायदा झाला नाही. शेवटी प्राण गेले पण त्यांना स्वातंत्र्य मिळाले नाही, उलट इंग्रज त्या लोकांवर मारहाण करीत, कारागृहात ठेवत. त्यामुळे भारतात गुलामगिरी वाढत गेली व शेवटी अनेक निरंतर प्रयत्नांमुळे क्रांतीवीर, समाजसुधारक, पत्रकार यांसारख्याच स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या भगतसिंग, राजगुरू, सुखदेव तसेच म. गांधी, आंबेडकर, लो. टिळक यांसारख्या अनेक महापुरुषांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले.

अखेर भारताला १५० वर्षीच्या गुलामगिरीनंतर १५ ऑगस्ट १९४७ ला पूर्णपणे स्वातंत्र्य मिळाले. आज आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली. या ७५ व्या स्वातंत्राचा अमृत महोत्सव प्रसंगी भारतातील लोक एकमताने सामील झालीत. धर्म-जाती-पंथ-भाषा वेगवेगळे असून एकत्र सण-उत्सव साजरे करणे हे भारताचे अखंडत्वाचे प्रतिक आहे. (दुश्मन हो खंड-खंड, रहे मेरा भारत अखंड) या घोषवाक्याप्रमाणे आपल्या भारताची स्थिती आहे.

जसे वेगवेगळे सात रंग मिळून इंद्रधनुष बनतो अगदी त्याच प्रकारे भारत हा सुद्धा वेगवेगळे लोक-रंग-भाषा-जाती-प्रांत-धर्म-सण (उत्सव) मिळून बनलेला आहे. जेव्हा १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला होता तेव्हा त्या काळात जो जोश-उत्साह त्या क्रांतिकारकांमध्ये होता तोच जोश आपल्या भावी युवकांमध्ये दिसत तर आहे पण फक्त एका दिवसासाठी ! स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जी तळमळ क्रातिकारकांनी केली ती तळमळ, जिद्द कुठेतरी हरवली आहे. आज आपण २१ व्या शतकात जगत आहोत. आजचे युग नवीनीकरणाचे-आधुनिकीकरणाचे आहे. या जगात भारताची अखंडता व स्वातंत्र्य अबाधित ठेवायचे असेल तर हाताची बोटे एकत्र आली पाहिजे, एकमताने, एकजुटीने राहिले पाहिजे. आज सर्वात जास्त तरुण पिढी आपल्या भारतात आहे. या जगात भारताची एक नवीन ओळख निर्माण करण्याची क्षमता आजच्या भावी युवकांमध्ये आहे आणि हेच उद्याचे भविष्य आहे.

आज आपण या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव प्रसंगी एक प्रण घेऊया, भारत हा विकसनशील नाही तर विकसित देशात गणूया !

***

# समानतेसाठी लढा

निखिल दिपक चनकापुरे
(बी.ए. भाग २)

**उषःकाल होता होता, काळरात्र झाली**
**अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली.....**

'वसुधैव कुटुम्बकम' ही जगाला दिलेली भारतीयांची शिकवण... सुपीक जमिनी, झाडे-वने, डोंगर-दऱ्या, पाणी-झरने, फळं-फुलं, अन्य खनिज संपत्तीने परिपूर्ण असा भारत.

भारताला जेवढा वैभवी इतिहास लाभला तेवढेच दुःख येथील नागरिकांना सहन करावे लागले. असो. जे झाले ते झाले. इतिहास आपण बदलू शकत नाही. पण, येणारं भविष्य मात्र आपल्या हातात आहे. कित्येक विदेशी भारतात आले आणि इथेच स्थायिक झाले. जगातल्या प्रत्येक जाती-धर्माचे लोकं भारतात आहेत.

जगात जसा विकास होतो तशा मोठ्या समस्याही निर्माण होतात. जसे जागतिक तापमान वृद्धी. यावर्षीचा उन्हाळा त्याचेच एक उदाहरण आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे जो पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे आपण असा विकास करायला हवा जो एक स्वच्छ-सुंदर पर्यावरण प्रेमी भारताचं भविष्य दाखवू शकेल. येणाऱ्या काळात देशाच्या सर्वसामान्य नागरिकांना मोठमोठ्या समस्यांनाही तोंड द्यावे लागणार आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या, राहण्यासाठी चांगल्या जागेची कमतरता, नोकऱ्यांचा अभाव इत्यादी. वर्तमान राजकारणी आणि त्यांच्या कार्यप्रणालीला पाहता आपलं भविष्य कुठे अंधारात तर जाणार नाही ना याची भीती वाटते. त्यामुळे त्यांच्यावर अवलंबून न राहता आपल्याला हिंमतीने नवा भारत निर्माण करायचा आहे.

उगवत्या सूर्याचा देश म्हटल्या जाणाऱ्या जपान देशाचं उदाहरण घेतलं तर दुसऱ्या महायुद्धात झालेल्या विध्वंसाला मागे सारत एक कृषिप्रधान देश असूनही जपान टेक्नॉलॉजीच्या बाबतीत अमेरिकेलाही टक्कर देतो.

मी अशा भारताची कल्पना करतो की, जिथे देशाचा एक-एक नागरिक समान असेल, भारतीय समाजामध्ये बंधुभाव-शांती अबाधित राहील, जिथे स्त्री-पुरुष समानता असेल, महिला निडर होऊन आपलं जीवन जगतील. जिथे पोटाची खळगी भरण्यासाठी भिक्षा मागावी लागणार नाही. काय ! आपण असा भारत निर्माण करू शकू....?

काही राजकीय नेते स्वतःला राजेच समजू लागले आहेत, त्यांना ही आठवण करून दिली पाहिजे की, भारत हा प्रजासत्ताक म्हणजेच प्रजेची सत्ता असलेला देश आहे. पण या सत्तापीपासू जुन्या कर्मकांडाने बुरसटलेल्या विचारधारेच्या नेत्यांनी शस्त्र और शास्त्र का परीक्षण म्हणून उद्याचं भविष्य असलेल्या, स्वतःच्या हक्कासाठी लढणाऱ्या विद्यार्थ्यावर अमानुष लाठीमार केल्याच्या घटना या देशात घडतात. आज जर आपण बोललो नाहीत तर उद्या मुके ठरलोच म्हणून समजा.

या भारतभूमीसाठी शहीद होण्याचे विचार मनात येतात, आदर्श भारताच्या उगवत्या सूर्याला पाहण्याची इच्छा मनात घर करून जाते.

एक गोष्ट मला आवर्जूनच लिहावीशी वाटते. जगातल्या प्रत्येक राज्याच्या दरबारात स्त्रीने नाचगाणी सादर केलेली आहेत. पण जगात एकमेव राजा असा झाला ज्याच्या दरबारात स्त्री कधीच नाचली नाही. कारण परस्त्रीला मातेसमान मानण्याची शिकवण राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांना दिली होती. आज राजकारणात

जाऊ पाहणाऱ्या प्रत्येक भारतीयाने एकदा शिवचरित्र वाचलेच पाहिजे. अठरापगड जातींसाठी महाराजांनी एकच शब्द वापरला तो म्हणजे मावळा...

अलीकडची पिढी कलमेला कमी आणि शस्त्रालाच जास्त महत्त्व देताना दिसत आहे. शस्त्राने सर्व सार्थक होते असाच विचार जर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि नेहरूंनी केला असता तर आज आपण जो भारत पाहत आहोत तो कधीचाच संपुष्टात आला असता. जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान बुद्धही याच भारत भूमीवर होऊन गेले.

**आपल्या देशातील वर्तमान राजकीय परिस्थिती बघता, स्वतःच्या स्वार्थापोटी माणूस कुठल्याही थराला पोहोचू शकतो. हे आपल्या ध्यानात येते. सामान्य माणूस जगो की मरो ह्यांना फक्त स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे. त्यामुळे एक सूज्ञ नागरिक म्हणून आपल्या देशाला जबाबदार राहायला पाहिजे. तुमच्या मताची किंमत मीठ-मिरची सारखी समजू नका. त्यातील सामर्थ्य ज्या दिवशी तुम्हाला कळेल तेव्हा ते मत विकत घेऊ पाहणाऱ्या इतके कंगाल कोणीच नसेल.**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## मतदार राजा जागा हो
## लोकशाहीचा धागा हो

आपल्या संविधानाने आपापल्या धर्मानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. अशी लोकशाही जगाच्या पाठीवर कुठेच सापडणार नाही.

आज माणूस तंत्रज्ञानाच्या युगात वावरतो आहे. कम्प्युटर, टीव्ही, स्मार्टफोन आदी त्याच्या जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहे. आज मानवाने वैज्ञानिक सृष्टी तर स्वीकारली पण तिला बघण्याचा दृष्टिकोन अजूनही स्वीकारलेला नाही. आजही माणूस सत्यता मांडायला गेला की, त्याचा दाभोळकर केला जातो. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हत्या केली जाते. आज जर आपण विरोध केला नाही तर उद्या पुन्हा बातमी यायची रोहित वेमुला आणि पायल तडवी प्रकरणाची पुनरावृत्ती झाली असे समजावे.

लेख जरा स्पष्टच आणि विद्रोही आहे. कारण सत्य पचायला जडच असतं.

***



# युद्ध नको बुद्ध हवा

**सुमित चंद्रिकापूरे**
**बी.ए. भाग ३**

आदिमतेकडून प्रगत अवस्थेकडे माणूस चालला आहे. मात्र असे करतांना चांगल्या आणि वाईट गोष्टींबद्दलचा विवेक माणसाने सोडल्याचे दिसते. पद, पैसा आणि प्रतिष्ठा यांना प्राप्त करण्याच्या प्रयत्नात तो हिंसक आणि क्रूर होतांना दिसत आहे. आपले वर्चस्व टिकून रहावे असे त्याला वाटते. आपल्याला हवे ते प्राप्त करण्याच्या नादात तो इतरांवर अन्याय आणि अत्याचार करू लागला आहे. पशूहून हिंस्त्र झालेला माणूस एकमेकांच्या जीवावर उठला आहे. युद्ध हाच त्याला पर्याय वाटू लागला आहे. द्वेषाला उत्तर द्वेष हेच त्याच्या डोक्यात भिनले आहे.

याचेच ज्वलंत उदाहरण म्हणजे रशिया युक्रेन युद्ध होय. या युद्धामुळे सर्व मानवजातीच्या अस्तित्वाचा प्रश्न जगासमोर उभा आहे. कारण हे युद्ध केवळ दोन राष्ट्रांपुरतेच मर्यादित राहिले नसून संपूर्ण जगच या युद्धात ओढले जाणार की काय अशी चिंता सर्वसामान्यांना भेडसावत आहे. रशियासारख्या बलाढ्य राष्ट्राने युक्रेनसारख्या लहानशा देशावर आक्रमण करून युक्रेनने आपले वर्चस्व स्वीकारावे यासाठी युद्ध सुरू केले. लहानशा युक्रेन आणि बलशाली रशिया अशा या युद्धात अमेरिका आणि युरोपीय देशांनी युक्रेनची बाजू घेतल्याने विश्वयुद्धाची भीती निर्माण झाली आहे. मुळात या युद्धाची सुरुवात होण्यामागे रशियाच्या राष्ट्राध्यक्षांची महत्त्वाकांक्षा असल्याचे दिसते.

युक्रेनला नाटोचे सदस्य व्हायचे आहे, पुतिन यांना ही बाब अजिबात मान्य नाही. युक्रेन आणि रशियाच्या सीमा एकमेकांना मिळतात. युक्रेनलाही आपली ताकद वाढविण्यासाठी नाटोमध्ये सामील व्हायचे होते. युक्रेनने आपल्या भौगोलिक स्थितीचा फायदा घेत अमेरिकेला नाटोचे सदस्य बनवण्याची मागणी केली. युक्रेनचे राष्ट्राध्यक्षांच्या या वागण्याने पुतिन चांगलेच चिडले होते. त्याने युक्रेन सीमेवर आपले सैन्य पाठवण्यास सुरुवात केली. रशियाच्या युक्रेनसोबतच्या तणावाचे हे महत्त्वाचे कारण आहे.


रशियन प्रजासत्ताक आणि युक्रेनही एकाच दिवशी अस्तित्वात आले. हा दिवस २५ डिसेंबर १९९१ होता. या दिवशी सोव्हिएत रशियाचे विघटन होऊन १५ नवीन देशांची निर्मिती झाली. या देशांमध्ये युक्रेन आणि रशियाचाही समावेश होता. १९९१ पूर्वी सोव्हिएत रशिया जगातील कम्युनिस्ट गटाचे नेतृत्व करत होता आणि त्याची अमेरिकेशी जोरदार स्पर्धा होती. त्यानंतर सोव्हिएत रशिया आणि अमेरिका यांच्यातील तीव्र शत्रुत्वाचा सामना करावा लागला, दोन्ही देश अनेकदा युद्धाच्या टोकाला आले. पण अमेरिका या शर्यतीत विजयी झाली आणि २५ डिसेंबर १९९१ रोजी यूएसएसआर १५ देशांमध्ये विभागली गेली. यामुळे अमेरिका संपूर्ण जगाचा पुढारी बनला.

१९९१ मध्ये ते अनेक भागांमध्ये विभागले गेले. रशियन नागरिकांमध्ये नाराजीची लाट पसरली. त्यावेळी रशियाची स्थिती खूपच कमकुवत होती. इच्छा नसतानाही त्याला आपल्या साम्राज्याच्या ऱ्हास सहन करावा लागला. अमेरिकेची रशियावर दडपशाही राहिली. नाटो या लष्करी संघटनेच्या माध्यमातून यूएसएसआरपासून विभक्त झालेल्या देशांना अमेरिकेने आपल्या प्रभावाखाली घेण्यास सुरुवात केली. नाटो देशांमध्ये एक करार आहे की, नाटोच्या कोणत्याही एका देशावर हल्ला झाला तर नाटो च्या सर्व सदस्यांनी त्याला स्वतःवर केलेला हल्ला समजला जाईल आणि लष्करी सामर्थ्याने प्रत्युत्तर देतील. नाटोमध्ये सध्या ३० देश आहेत. अशाप्रकारे अमेरिकेने नाटोच्या माध्यमातून रशियावर वर्चस्व प्रस्थापित करण्याला सुरुवात केली. हीच बाब रशियाच्या राष्ट्राध्यक्षांना मान्य नाही. ते सत्तेत आल्यानंतर यूएसएसआरपासून वेगळे झालेल्या देशांना एकत्र आणण्याचा विचार करीत असतांनाच

युक्रेनने वेगळी वाट धरल्याचे त्यांना मान्य झाले नाही. युक्रेनने नाटोचे सदस्यत्व स्वीकारू नये. यासाठी युक्रेनवर दबाव आणला, मात्र युक्रेनच्या राष्ट्रपतींनी रशियाच्या दबावाला कोणत्याही प्रकारे बळी न पडता रशियाचा प्रस्ताव झुगारला. परिणामतः रशियाने युक्रेनवर हल्ला केला. या युद्धाला युक्रेन आपल्या सर्वशक्तिनिशी प्रत्युत्तर देत रशियाला पुरून उरला आहे. हे युद्ध बऱ्याच कालावधीपासून चालू असून चिमुकल्या युक्रेनवर बलाढ्य रशियाला अजूनही विजय प्राप्त करता आला नाही. या युद्धाची झळ संपूर्ण जगाला बसली आहे. अनेक लोकं मृत्युमुखी पडले आहे. जगातील सर्व देशांची अर्थव्यवस्था कोलमडली आहे. पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांचा नाश होत आहे. तिसऱ्या महायुद्धाच्या शंकेने जगाचं अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जर जगाचे आणि माणसाचे अस्तित्व टिकवायचे असेल तर प्रेम, करुणा, मानवता आणि शांती यांचा संदेश देणाऱ्या तथागत गौतम बुद्धांच्या शांतीविचारांच्या मार्गानेच या युद्धावर उपाययोजना करता येणे शक्य आहे. प्रत्येक माणसांतील मानव हित जपणारा आणि मानव धर्म हाच जगात सर्वश्रेष्ठ मानणाऱ्या तथागत गौतम बुद्धांच्या विचारांचे माणसाला विस्मरण झाले आहे. आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या नादात त्याने आपले अस्तित्व पणाला लावले आहे. हिंसा, युद्ध यामुळे माणसाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. ओल्या बरोबर सुकेही जळते या उक्तीप्रमाणे दोघांच्या लढाईत निरपराध लोकांचाही बळी जातो. ही लढाई केवळ दोन व्यक्ती, दोन समाज, दोन राष्ट्र यांपुरतीच मर्यादित न राहता सर्वांना याचे परिणाम भोगावे लागतात. असे होऊ नये म्हणून आजच्या काळात शांतीचा आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या तथागत गौतम बुद्धांच्या विचारांचे अनुसरण करणे अत्यंत महत्त्वाचे व आवश्यक आहे.

*****



# जागतिक पर्यावरण दिवस

**कु. प्रगती सेलुकर**
**बी.ए.- भाग ३**



५ जून हा जागतिक पर्यावरण दिवस मानला जातो. पर्यावरणात जर आम्ही समतोल राखला तर मानवजात सृष्टीत टिकून राहील. पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील आणि पृथ्वी भोवतालच्या वातावरणाचा समतोल हा समतोल राखण्यात वृक्ष, सारे आम्हाला खूप मदत करतात म्हणूनच भारतीय संस्कृतीमधील वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या वृक्षांची, रोपांची पूजा करण्याची परंपरा खूप दूरदृष्टीची म्हणावी लागेल.

रोज संध्याकाळी तुळशीला पाणी घालून तिच्याजवळ दिवा लावायचा, वडपौर्णिमेला मोठमोठ्या पारंब्या असणाऱ्या वडाची पूजा करायची. या आणि अशा रितीने वृक्षांचे जतन होते, पर्यावरणाचा समतोल साधतो. झाडे कार्बन-डाय-ऑक्साईड शोषून घेतात, ऑक्सिजनला बाहेर फेकतात. ग्लोबल वॉर्मिंगपासूनही आम्हाला हे वृक्ष वाचवतात. एकाच ठिकाणी उभी राहणारी झाडे, पुन्हा पुन्हा वारा, पाऊस सहन करतात आणि दुसऱ्यांना सावली देतात.

पक्षी, प्राणी, कृमी असे अनेक जीव झाडांच्या आश्रयाने राहतात. ऑक्सिजन म्हणजे प्राणवायूचे हे जणू कारखाने आहेत. झाडे वाचली तर पर्यावरण सुरक्षित राहील आणि पर्यावरण आमचे म्हणजे मानवजातीचे रक्षण करेल. म्हणून जगलांचे रक्षण आम्ही केले पाहिजे. ही जंगले तयार व्हायला हजारो वर्षांचा काळ जावा लागला. जंगले तोडायला मात्र अगदी थोडे दिवस पुरतात हे आम्ही विसरत आहोत. उद्योग, कारखाने यांची बेफाम वाढ आज होते आहे. माणसे शहराकडे धाव घेत आहेत. या साऱ्यांसाठी निर्दयपणे झाडे तोडली आहे. वृक्षप्रेमाचे हे जुने नाते माणूस विसरत आहे. आता स्वतःच्या सवयी बदलायची वेळ झाली आहे.

कागदापेक्षा इ.मेलचा अधिक वापर. कमी ऊर्जेचे दिवे वापरून फेकण्याच्या वस्तूऐवजी चिनी मातीच्या कपबशा, पेपर नॅपकीन ऐवजी सुती टॉवेल, पाण्याचा जपून वापर हे आम्ही करायला हवे. पर्यावरणाचे भान आम्ही ठेवले तरच मानवजात वाचण्याची शक्यता आहे.

**वापरात आणा गोष्ट अशी**
**जी निसर्गाला नुकसान**
**पोहचवू शकत नाहीत**
**पर्यावरणाची रक्षा हीच जगाची सुरक्षा**

जगाला वाचविण्यासाठी जागतिक पर्यावरण दिवसाची योजना करण्यात आली आहे.

आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता ही पूर्णपणे पर्यावरणातून, निसर्गातून होत असते हे आपल्याला माहिती असूनसुद्धा पर्यावरण संवर्धनाकरिता आपल्याकडून कोणतेच प्रयत्न होतांना दिसत नाही. उलट पर्यावरणामध्ये उपलब्ध घटकांचा वापर आपण आपल्या हव्यासापोटी करीत आहोत. मानवाच्या या स्वार्थी वृत्तीमुळे पर्यावरणाचे संतुलन मोठ्या प्रमाणावर बिघडत चालले असून त्याबाबत वेळीच जागरुकता न झाल्यास येणाऱ्या काळात गंभीर

समस्यांना सामोरे जावे लागेल यामध्ये कोणतेही दुमत नाही.

पर्यावरणामध्ये उपलब्ध असलेल्या घटकांचा वापर मानवाने आपल्या बरोबरच इतर सजीव घटकांचा विचार केल्यास पर्यावरणाचा समतोल बिघडणार नाही व भविष्यात येणाऱ्या पर्यावरणीय समस्यांना सामोरे जावे लागणार नाही. परंतू सध्याची स्थिती लक्षात घेता पर्यावरणीय समस्या दिवसेंदिवस वाढत असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर हानी होताना दिसत आहे. पर्यावरणातील प्रत्येक सजीव घटकांचे संवर्धन करणे ही आपली एक सामाजिक जबाबदारी आहे हे विसरून चालणार नाही.

**खूप झाल्या घोषणा**
**आता खूप झालेसमाजकारण**
**वृक्ष लावा एक तरी**
**होईल मग पर्यावरण रक्षण**




विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी जागतिक पर्यावरण दिवस अनेक शाळांमध्ये, कॉलेजमध्ये तसेच अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे साजरा केला जातो.

या दिवशी शाळांमध्ये निबंधस्पर्धा, भाषण स्पर्धा अशा अनेक स्पर्धांचे आयोजन केले जाते. असे प्रयत्न केल्यास संपूर्ण सृष्टी हिरवीगार व्हायला वेळ लागणार नाही.



# माझे बाबा

कु. शिवानी खंते
(बी.ए. भाग ३)

माझे बाबा म्हंटलं की, बाबांविषयी काय बोलावे हे कळतच नाही ! पण आईचं तसं नाही ! हे असं का ? बाबा आपल्यासाठी काही करत नाही का ? असा विचार मनात आला तो म्हणजे एकाच गोष्टीचा. तो होता माझे बाबा.....!

माझ्या बाबांचं नाव प्रमोद आहे. कोणी बाबांना वडील, पप्पा, बाबा अशा नावाने हाक मारतात. पण मी माझ्या बाबांना बाबा असे बोलते. माझ्या बाबांचं बोलायचं झालं तर ते सगळ्या वडिलांप्रमाणे एकदम कडक आहेत आणि गंमत म्हणजे तुमच्या सारखी मीही त्यांना खूप घाबरते.

पण एक मिनिट बाबा म्हणजे सर्वांना वाटते की, एक कडक, शिस्तप्रिय माणूस. पण असे नाही. आई जितकेच बाबा सुद्धा निर्मल व आपल्याला नकळत खूप प्रेम आणि माया करतात. पण लहानपणापासून आपल्याला अशी सवय लागली असते की, आपल्याला बाबांचं नाव सांगितले की घाबरगुंडी भरते.

सगळ्यांना आई खूप आवडते कारण आपण सगळे जे काही असेल, प्रत्येक लहान गोष्टीपासून ते काही मोठे झालं की लगेच आईला जाऊन सांगतो. कोणती वस्तू हवी असेल तरी आपण न घाबरता त्या वस्तूसाठी आईकडे हट्ट करू लागतो. पण बाबांच्या बाबतीत तसे नसते. आपल्याला बाबांकडे काही मागणं तर सोडा काही बोलायलाही भीती वाटते.

कारण लहानपणापासूनच काही झाले की, आई आपल्याला सांगते हे करू नको ते करू नको, अभ्यास कर आणि नाही केला तर बाबांना नाव सांगेन आणि बाबा तुला ओरडतील. अशी बाबांची भीती आपल्यामध्ये लहानपणापासूनच निर्माण केली जाते आणि आपल्याला ओरडतील याच भीतीने आपण त्यांना घाबरू लागतो. पण बाबा खरच असे असतात का ?

नक्कीच नाही ! बाबा आपल्यावर भरपूर प्रेम करतात, पण ते आपल्याला दाखवत नाही. दिवाळी असली की बाबा सगळ्यांसाठी हवे तसे कपडे घेऊन देतात ते कधी मात्र काही घेणार नाही. ते बोलतील माझ्याकडे तर आहेत कपडे मला काय गरज. पण असे नसते ते फक्त आपला विचार करत असतात. ते स्वतः जुने कपडे वापरतात पण आपल्या मुलांना नवीन कपडे घेऊन देतात.

बाबा नेहमी आपल्या मुलांच्या भविष्याचा विचार करत असतात. ते आपल्याला ओरडतात हे खरं आहे. पण ते असं करतात कारण आपण आपल्या आयुष्यामध्ये काही चांगले करावे म्हणूनच त्यांना आपली खूप काळजी असते. आपल्याला बरं नसले तर बाबांना रात्रभर झोप लागत नाही ते आपली चिंता करत बसतात.

कधी पण आपल्याला थोडसं लागलं किंवा काही झालं तर आपल्या तोंडून एकच शब्द येतो तो म्हणजे आई गं! पण जेव्हा काही मोठं होते तेव्हा तोंडातून येणारा शब्द असतो बापरे ! ही एक गंमतच आहेना. बाबा आपल्यासाठी जीवनभर खूप कष्ट करतात. कारण त्यांना आपल्याला मोठं करायचं असते. ते आपल्यासाठी स्वतःच्या जीवाचं रान करतात. अजूनही माझं बाबांवर खूप प्रेम आहे. मला माझे बाबा खूप खूप आवडतात.

बाबा शब्दातच गोडवा ! प्रत्येक मानवाच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचं नातं म्हणजे जन्मदात्याचं ! नऊ महिने पोटात वाढवून जन्म देणारी आई ! तर या बलाढ्य जगात स्वतःचं नाव आपल्याला देऊन आपलं रक्षण करणारे बाबा. प्रत्येक बाबांचं आपल्या मुलांसाठी; कुटुंबासाठी हळवं होणारं मन ही या जगातील सर्वात मौल्यवान गोष्ट आहे असं मला वाटतं.

बाबांचा स्वभाव जेवढा प्रेमळ आहे तेवढाच रागीटही आहे. आमच्याकडून किंवा आईकडून काही चूक झाल्यास बाबा आम्हाला रागवतात आणि समजूनसुद्धा सांगतात. म्हणून बाबांना माझ्या आयुष्यामध्ये खूप महत्त्वाचे स्थान आहे. थोडक्यात माझे बाबा माझा आधारस्तंभ आहेत. बाबा माझ्या सोबत आहेत म्हणून मी आयुष्यामध्ये पुढे जाऊ शकणार.

*****

# खरे जीवन म्हणजे काय ?

**आचल लक्ष्मण पाटील**

**(एम.ए. भाग १)**

खरे जीवन नेमके काय आहे, आपण कधी लक्षात घेतले आहे काय ?

घरी टीव्ही आल्यापासून आपण दुसऱ्यांशी बोलणे विसरून गेलो आहे, आपण कित्येकांशी संवाद साधणे, संपर्कात येणे विसरून गेलो आहे, आपण दारात गाडी आल्यापासून चालणे विसरून गेलो आहे, खिशात आपल्या कॅल्क्युलेटर आल्यापासून पाढेसुद्धा विसरून गेलो आहे. ऑफिसमध्ये एसी, कूलर, पंखा यामुळे जो आज बाहेरचा थंड गारवा असतो तो विसरून गेलो आहे, रस्त्याने जाताना सगळे रस्ते डांबराचे व सिमेंटचे बनले असल्याने आपण ज्या भूमीवर चालतो त्या मातीचा वास विसरून गेलो आहे. मनाला इतके श्रम असतात की, शरीराला कष्ट द्यायलाही विसरून गेलो आहे. ह्या अलगच्या जेवणाच्या प्रकारात जी मन भरणारी भाकर आहे ती विसरून गेलो आहे, सतत या धावपळीच्या जीवनात क्षणभर तरी निवांत बसणे विसरून गेलो आहे.

पण, जागेपणी सुखानं झोपणं जाऊ द्या हो, आपण सुख विसरून गेलो आहे. एखाद्या साधनाप्रमाणे विनोद जे हसमुख असतात त्याला ऐकत बसायला विसरून गेलो आहे आणि विसरल्यामुळे खरे जीवन जगणेच विसरून गेलो आहे.

बघा आपण या धावपळीच्या जीवनात सर्वकाही गोष्टी आपल्या मनात असून आपली बुद्धिमत्ता आपल्याला ते करायला सांगत नसते, जे मी सांगितले आहे ते खरे जीवन आहे की त्याच्या उलट समज हे खरे जीवन आहे. खरे जीवन कोणते तुम्हाला हे आता थोडक्यात कळलं असेलच....

नक्की मला सांगा....



# शिक्षणाची खरी किंमत

**रुचिका भडंग, माजी विद्यार्थी**

आजचे युग हे विज्ञानाचे युग आहे. या युगात प्रत्येक व्यक्तीला ज्ञान असणे आवश्यक आहे. किंबहुना स्वतःची प्रगती घडवून आणण्यासाठी त्याला शिक्षणाची पुरेपूर आवश्यकता असते. प्रत्येकाला मनापासून वाटते की, मला चांगले शिक्षण मिळाले पाहिजे, पण याचा अर्थ असा होत नाही की, प्रत्येकाला चांगले शिक्षण मिळेलच आणि मिळाले तरी तो त्याचा पुरेपूर उपयोग करून घेईल. प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची ओढ ही असायलाच हवी.

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. येथे प्रत्येकाला नोकरीची गरज आहे. पण आपल्याला ती मिळविण्यासाठी संघर्ष हा करावा लागणारच आहे.

युपीएससीमध्ये चमकलेल्या पोरा-पोरींच्या कौतुकाच्या बातम्या सध्या गावभर सुरू आहे. जोडीला कोचिंग क्लासेसच्या मोठमोठ्या जाहिराती झळकत आहेत. बापाने जमीन विकली आणि पोरगी अधिकारी झाली. टेम्पोचालकाचा मुलगा कलेक्टर झाला वगैरे बातम्यांचा पाऊस पडतोच. अशावेळी कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही अशी स्थिती असलेल्या मुला--मुलींकडे कोणाचे लक्ष नाही. स्पर्धा परीक्षांचा बाजार सध्या एवढ्या तेजीत आहे की, अशा मुलांकडे लक्ष जाण्याचेही कारण नाही. बाजाराला दरवर्षी नवे नायक मिळतात. हे नायक मोटीव्हेशनल स्पीकर होऊन जातात. त्यांच्या भाषणानी काही प्रेरितही होतात. असा हा प्रवास सुरू असतो. युपीएससीसाठी बारा लाख अर्ज आले तर त्यातल्या आठशे लोकांना पोस्ट मिळते. एमपीएससी मध्येही असेच प्रमाण आहे. हे आठशे लोक सगळीकडे झळकतात. बाकीच्या विद्यार्थ्यांची काय स्थिती आहे हे कोणी विचारायला जात नाही. दरवर्षी काही मुले आत्महत्याही करतात. कारण त्यांना पोस्ट मिळत नाही.

वयोमर्यादा संपेपर्यंत मुले अभ्यास करत असतात. शेवटी ती मुलेही राहत नाही अशा वयाची होतात. वंचित समूहांची वयोमर्यादा अथवा त्यांना पोस्ट न मिळाल्यामुळे ते हवालदिल होतात. जी मुले क्वालिफाय होतात ती फार बुद्धिमान असतात असं नाही. जी होत नाहीत ती अपात्र असतात असही नाही. परीक्षा नावाचं प्रकरण फार विश्वासार्ह असतं, असे मुळीच नाही. लागला तर एकदम मालामाल आणि नंबर नाही लागला तर आयुष्याची दाणादाण. कारण घरचे बोलतात त्यावरून समाजही बोलतो. तू इतक्या वर्षात काय केले ?

असू द्या. दुसरा मुद्दा म्हणजे आपल्याला लहानपणी सगळे विचारायचे - मोठा झाल्यावर तू काय होणार ? तेव्हा आपण मोठ्या आनंदानी सांगतो की, मला डॉक्टर, प्रशासकीय अधिकारी व्हायचं. पण ते होण्यासाठी किती संघर्ष आणि मेहनत करावी लागते हे त्यावेळी आपल्याला कळत नाही. आपण जसे मोठे होतो तेव्हा आपल्याला शिक्षणाची खरी किंमत कळते. समजा एखादा व्यक्ती पदवी मिळवतो तर त्याला वाटते की, मला या पदवीच्या आधारावर नोकरी मिळेल. पण तसे नसते. ती पदवी फक्त आपल्याला स्पर्धा परीक्षांचे फॉर्म भरण्यासाठी उपयुक्त असते.

डॉ. आंबेडकर म्हणतात, शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा. तसच आपणही तो संघर्ष करायलाच पाहिजे आणि माणसाने निराश होऊ नये. कारण यश आणि अपयश हे आपल्या हातात नसतं. उद्या आपल्याला असे वाटू नये की, मी प्रयत्नच केला नाही, जर केला असता तर मी अधिकारी झालो असतो. ही खंत आपल्या मनात राहायला नको.

आपल्याला तर सगळे काही मिळत आहे पण ज्या मुलांना काहीच मिळत नाही त्यांनी काय करावे ? त्यांना तर धड दोन वेळचं जेवणही मिळत नाही. तशाही परिस्थितीत मुलं पीएसआय, कलेक्टर होतात. एक दिवस आपलाही नंबर लागेल. कारण माणसाने जरी पुस्तकाची साथ सोडली तरी पुस्तके मात्र माणसाची साथ सोडत नाहीत. ती प्रत्येकाशी प्रामाणिकपणाने वागतात. महणून पुस्तकाशी आपणही मैत्री करायला हवी.

स्वर्गापेक्षा चांगल्या पुस्तकाचे मी अधिक स्वागत करीन. कारण पुस्तक जिथे असतात तिथे स्वर्ग निर्माण होतो.

शेवटी शिक्षण हे ज्ञानाचे भांडार आहे. त्यामुळे प्रत्येकाने प्रामाणिकपणे ते प्राशन करायलाच हवे.

***

# पद्य विभाग

# माय मराठी

माय मराठीचा ठेवा जरा जपून ठेवा
सुगंध मराठीचा आसमंतात भरावा
माय मराठी ही माझी जशी नवी तशी जुनी
तिचे रूपडे सुंदर ध्यास तिचा मनोमनी ।।

धन्य माझी माय मराठी माऊली
थोर महती हिची शब्दाशब्दात ओथंबली
संतांनी वाणीतून गीत हिचेच गायले
डुल्या मातीला, इथल्या मनाला हिनेच पोसले ।।

अशी रसाळ मधाळ गोडी तिची वर्णू किती
वारा, जल पाने फुले गाती हिची महती
काय सांगू हिची मात शब्द येती ओठी
माय मराठी जणू सरस्वतीची निर्मिती ।।

**कु. साक्षी पुप्पुलवार**
**(बी.ए.- भाग ३)**







# आठवणी

आठवणींचे असेच असते हळूच येऊन स्पर्शून जाणे
निःशब्द भावनांना स्मित देत खुलवून जाणे ।।
आठवणींचे येणे जाणे अस्तित्व त्या ठेवून जाती
स्मरण होता कधी कधी भावना त्या अनावर होती ।।
मौनाची ती अलग भाषा रोमांचित वा उदास करिती
स्पर्शातून या आठवणीही मौनातून बोलून जाती ।।
लपंडाव हा आठवणींचा भावनांना बहर येतो
नव्या जुन्या या आठवणींना कधी असा फुलोर येतो ।।
सांज सावल्यांच्या ठायी असाच रंगी रंगून जाई
निश्चलतेची सीमारेषा अशी उगी भंगूनी जाई
आठवणींचे अलगद येणे, येणे जसे चांदण्यांचे
शिशिराच्या पानगळीतही येणे जसे वसंताचे ।।

**अभिषेक डहाट**
**(बी.ए.- भाग २)**

# कुणीतरी असावं

कुणीतरी असावं
भावनांना समजावं
एकरूप व्हावं
जपत जपत

कुणीतरी असावं
जीवाला जपावं
जवळ बसावं
हसत रुसत

कुणीतरी असावं
दुरून दिसावं
माझ्याकडे बघावं
लपत छपत
कुणीतरी असावं
मलाच पाहावं
जवळ घ्यावं
कळत नकळत
कुणीतरी असावं
हाती हात घ्यावं
दूर दूर न्यावं
फिरत फिरत
कुणीतरी असावं
सांज वेळ व्हावं
मी वाट पहावं
विरत झुरत
कुणीतरी असावं
हृदयात बसावं
मी धुंद व्हावं
रमत गमत

**कु. दिव्या गणेशकर**
**(बी.ए.- भाग १)**

# नीती–सार

जी माणसं हवीशी वाटतात,
ती कधीही भेटत नाहीत
जी माणसं नकोशी वाटतात,
त्यांचा सहवास संपत नाही
ज्यांच्याकडे जावेसे वाटते
त्यांच्याकडे जायला जमत नाही
ज्यांच्याकडे जाऊ नये असे वाटते
त्यांच्याकडे जावे लागते.
जेव्हा जीवन नकोसे वाटते
तेव्हा काळ संपत नाही.
जेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळतो,
तेव्हा काळ संपलेला असतो.
नशीब हे असंच असतं,
त्याच्याशी जपून वागावं लागतं.
जिथे कोणाचेच काही चालत नाही
तिु जीवनाला काहीच पर्याय नसतो.

*****

**कु. आरती चव्हाण**
**(बी.ए.-भाग ३)**

# ऑनलाइन शिक्षा

था टिचर का ब्लॅकबोर्ड, कभी ज्ञान का खजाना
हुआ ये किस्सा पुराना, अब है मोबाईल का जमाना ।

मिल जाते है मोबाईल पर ही गुरुजी
कहते वही से तुम, पढाई करो गुरुजी ।

अब मोबाईल में टिचर, टिचर के पास मोबाईल
देखते देखते सारे स्टुडन्ट करने लगे स्माईल ।

बच्चे अब कर लेते है, वही से आज्ञा का पालन
पढाई के नाम पर होता, गेम का संचालन ।

ऑनलाईन पढाई से मम्मी पापा भी खुश
नही पता वही से लुडो खेल रहा है उनका दृष्य ।

अब टिचर की डाट से भी बच्चे होते बडे प्रसन्न
क्योंकि टिचर को चुप करने का उनके पास हे बटन ।

टिचर मोबाईल से थोडा थोडा ही पढायेंगे
नही तो बच्चे मोबाईल बंद करके भाग जायेंगे ।

अब सारे टिचर मोबाईल पर ही पढायेंगे
मम्मी पापा भी खुश की बच्चे कुछ कर दिखायेंगे ।

**कु. कीर्ती राजेंद्र कुर्वे**
**(एम.ए. मराठी-भाग १)**

# ईश्वर दो ऐसा वरदान

ईश्वर दो ऐसा वरदान
जिससे बने हम सब इन्सान
ईश्वर को माने सभी
ईश्वर को पूजे सभी
ईश्वर ही है कणकण में
ईश्वर ही है तनमन में
ईश्वर दो ऐसा वरदान
जिससे बने हम सब इन्सान
ईश्वर ही है सुख में
ईश्वर ही है दुख में
ईश्वर ही है पंचप्राण में
ईश्वर ही है जन्मदान में
ईश्वर दो ऐसा वरदान
जिससे बने हम सब इन्सान

**कु. प्रीती पराते**
**(बी.ए.-भाग २)**

# आई



आईसाठी काय लिहू
आईसाठी कसे लिहू
आईसाठी पुरतील एवढे
शब्द नाही कोठे
आईवरती लिहिण्या इतपत
नाही माझे व्यक्तिमत्त्व मोठे

जीवन हे शेत तर
आई म्हणजे विहीर...
जीवन ही नौका तर
आई म्हणजे तीर...

जीवन ही शाळा तर
आई म्हणजे पाटी...
जीवन हे कामच काम तर
आई म्हणजे सुट्टी...

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातली पवित्र तुळस
आई म्हणजे एकांतात गुणगुणावी
अशी सुंदर गाणी...

आई म्हणजे वाळवंटात
प्यावे असे थंडगार पाणी...
आई म्हणजे आरतीत
वाजवावी अशी पवित्र टाळी...

आई म्हणजे वेदने नंतरची
सर्वात पहिली आरोळी

शब्द नाही आहे आई
तुझे गुणगान गायला
जन्म तू मला दिलास
जगात या यायला

कसे तुझे उपकार फेडू सांग बरे
तुझ्याविना या जगात
आहे का कोणी खरे
शब्दच नाही आहे आई
तुझे गुणगान गायला

हवा, पाणी, सूर्य, चंद्र
सर्वच आहे साक्षीला
धरती आणि अंबर
सोबत होते तुझ्या
देवानेही जन्म घेतला
आई तुला पाहायला
शब्दच नाही आहे आई
तुझे गुणगान गायला

***

**कु. कीर्ती राजेंद्र कुर्वे**
**(एम.ए. मराठी-भाग १)**

## काश मी फुलपाखरू असते !

काश मी फुलपाखरू असते
उंच आकाशात उडले असते
हिरवे पिवळे रंग छटा
किती सुंदर दिसले असते
या फुलावर त्या फुलावर
इकडून तिकडे उडले असते
इवले इवले डोळे, इवले इवले पंख
उडते दूर दूर
काश मी फुलपाखरू असते
ना कुणाची रोख, ना कुणाची टोक
ना कुठलेही बंधन असते
काश मी फुलपाखरू असते
नदी तटावर गेले असते
तिथले हिरवेगार दृश्य पाहून
मनमोहित झाले असते.

**कु. प्रीती पराते**
**(बी.ए.-भाग २)**



# आनंद

आयुष्यातली सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे आनंद.
आनंद हा अनेक गोष्टींनी मिळत असतो.
आनंद ही एक मौल्यवान गोष्ट असूनही ती
आपल्याला विनामूल्य मिळालेली आहे.
त्याहूनही एक अशी गोष्ट आहे की, आनंद म्हणजे काय ?
आयुष्य संपेपर्यंत काही व्यक्तींना त्याचा पत्ताच नसतो.
आपल्या कामामध्ये ते इतके मग्न होतात की,
आनंद नेमका त्यांना कळतच नाही.
आनंदाने उगवत्या दिवसाच्या वेळेला सामोरे जावे
मावळताना तो तुम्हाला खूप आनंद देऊन जाईल.
आनंदाने मात्र हे लक्षात घ्यावे.
नेमका आनंद आहे काय ?
आनंद हा कुठेही असू शकतो.
फुलपाखराच्या मागे गेलो की, आनंद
तो दूर जातो तो आनंद
आपण निवांत बसलो की, तोही आनंदच.
आणि मग तोच आपल्या मनात होतो तो आनंद.

**आंचल लक्ष्मण पाटील**
**(एम.ए. अर्थशास्त्र**
**प्रथम वर्ष - २०२१-२२)**

## मुलगी आहे म्हणून का ?

का नेहमी हे माझ्या वाट्याला
का नेहमी सगळं मीच समजून घ्यायचं

मीच नेहमी सगळ्यांचा विचार करायचा
कोण, कसं, कधी, कुठे, काय
हे भान फक्त मीच ठेवायचं का ?

त्याच्याप्रमाणे मी सुद्धा मानवच आहे.
मला वाटतं आपण असं करावं,
असं राहावं, असं जगावं,
मग का नेहमी मला माझ्या इच्छा
मारून जगावं लागतं.

लहानपणापासून यांचा विचार,
त्यांचा विचार, तो मरेपर्यंत

मी काही केलं तर
माझ्या आई-वडिलांना लोकांचं ऐकावं लागेल,
त्यांना तोंड द्यावं लागेल
हा सर्व विचार माझ्याच वाटेला कां ?

तिन्ही कुळाची नावं चालवण्याची
जबाबदारी फक्त माझीच का ?

हे सर्व का पण ?
कारण फक्त एवढच की मी एक

मुलगी आहे म्हणून !

**कु. निकिता एस. क्षीरसागर**
**(बी.ए. भाग १)**

## मन

निसर्गाच्या कुशीत
जाऊनी एकदा रहावे
मनातील सगळे भाव
व्यक्त तिथे करावे

हिरव्या-हिरव्या डोंगररांगात
निर्माण करावी नाती
त्यात पक्ष्यांचे थवे
सुरात गाणी गाती

पावसाच्या थेंबा-थेंबात
मन चिंब ओले व्हावे
इंद्रधनूची कमान पाहून
त्यावर उंच झोके घ्यावे

मनातील भाषेने
पशू-पक्ष्यांशी बोलावं
एकदा सागराशी भेट घेऊन
स्वतःला विलीन त्यात करावं

डोळ्यातून अश्रू गळून
तो दवबिंदू बनावा
जसा चमकतो हिरा
तसा त्याचा भास व्हावा

वसुंधराची ही किमया
पाहून मन भरून येई
म्हणून वाटे एकदा
जगावे बेधुंद होऊनी

**कु. अंकिता हरिदास पाटील**
**(एम.ए. भाग १)**

# निर्णय

निर्णय म्हणजे नेमके काय ?
आपले जे जीवन चालू आहे त्या हिशोबाने
आयुष्यातले निर्णय चुकतात
आणि मग आयुष्य चुकत जाते
एका निर्णयाने पूर्ण आयुष्य उलगडून राहते
कधी कधी प्रश्न कळत नाहीत
आणि त्याचे उत्तर चुकत जाते.
प्रश्न सोडवताना वाटते सुटत गेला गुंता...
पण प्रत्येक वेळी नवीन गाठ जमत जाते
ध्येय दाखविणाऱ्याला वाट माहीत नसते
पण चालणाऱ्याचे ध्येय मात्र हरवून जाते
काही गोष्टी वाटतात तितक्या सोप्या नसतात
अनुभव म्हणजे काय हे तेव्हाच कळते
जेव्हा एखादी ठेच (गोष्ट मनाव्यतिरिक्त) काळजाला लागते.

**अर्चना लक्ष्मण पाटील**
**(बी.कॉम. भाग २)**

**"गेलेला दिवस बदलला जाऊ शकत नाही परंतु येणारा दिवस बदलवणे तुमच्या हातात असते."**

# विभागिय अहवाल

# मराठी विभाग

**प्रा. डॉ.अंजली पांडे**
**मराठी विभाग प्रमुख**

'अक्षर अर्णव' मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना सत्र १९९९ मध्ये झाली. विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्यविषयक अभिरुची निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून मराठी अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. या अभ्यास मंडळांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेला वाव मिळावा म्हणून लेखन–वाचन विषयक कार्यक्रमांचेही आयोजन दरवर्षीप्रमाणे या सत्रातही करण्यात आले. सद्यःपरिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झाला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून कार्यक्रमाचे आयोजन करणे क्रमप्राप्त झाले आहे. शैक्षणिक वेळापत्रकातही विशेषत्वाने बदल झाला आहे. प्राप्त परिस्थितीशी समायोजन करीत मराठी विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कोरोनामुळे शिक्षण पद्धतीत म्हणजेच अध्ययन–अध्यापन पद्धतीत आमूलाग्र बदल झाले आहे. आभासी शिक्षणाबरोबरच परीक्षा पद्धतीतही विलक्षण बदल झाले आहे. रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या वतीने लावण्यात आलेला नवीन अभ्यासक्रम आणि नवीन परीक्षा प्रणाली ही विद्यार्थ्यांना सुलभतेने कळावी यासाठी बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय आणि सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए. सत्र ३ मराठी साहित्य या विषयाच्या अभ्यासक्रमावर आधारित दिनांक ११ जून ते २३ जून २०२१ दरम्यान, अकरा दिवसीय आभासी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध महाविद्यालयांच्या प्राध्यापकांनी अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यक्रमावर सविस्तर विवेचन केले. या व्याख्यानमालेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

तसेच बी.कॉम. सत्र ४ च्या आवश्यक मराठी या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा, मनोहरराव कामडी महाविद्यालय, नागपूर आणि सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर येथील मराठी विभागाच्यावतीने दिनांक २३ जुलै २९ जुलै २०२१ दरम्यान मराठी साहित्य या विषयावरील आभासी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध महाविद्यालयांच्या प्राध्यापकांनी अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यक्रमावर सविस्तर विवेचन केले. या व्याख्यानमालेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

अशा प्रकारे वाङ्मयीन अभिरूची वाढविण्याचे तसेच विविध वाङ्मय प्रकारांची माहिती करून देण्याचे तसेच परीक्षेत यश संपादन करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळातर्फे केले जाते.

*****

# राज्यशास्त्र विभाग

**प्रा.डॉ. प्रतिभा गडवे-दातीर**
**विभागप्रमुख**

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून राज्यशास्त्र हा विभाग कृतीशील आहे. विद्यार्थ्यांमध्ये विशिष्ट राजकीय दृष्टिकोन निर्माण करून राजकीय मूल्यबीजांचे रोपण करून सुबुद्ध जागरूक नागरिक निर्माण करणे तसेच संविधानाप्रती जनता व विद्यार्थ्यांमध्ये निष्ठा निर्माण करणे अशा विविध दृष्टिकोनातून हा विषय निरनिराळे उपक्रम राबवून, विद्यार्थ्यांना कृतीप्रवण ठेवण्यात येते. यासाठी निरनिराळे उपक्रम राबवण्यात येतात. वर्गनिहाय सेमिनार, गटचर्चा, तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन, व्याख्यान नवीन अध्यापन कौशल्यांचा वापर, ई लर्निंग इत्यादींचा वापर करून विद्यार्थ्याची अध्ययनात रुचि निर्माण केली जाते. तसेच अभ्यास सहल, रॅली यासारख्या उपक्रमांचे आयोजन करून आपली उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न विभाग सतत करीत असतो व याला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद नेहमीच प्राप्त होतो.

सत्र २०२१-२२ या वर्षात या विभागाद्वारे खालील उपक्रमाचे आयोजन केल्या गेले. सन २०२१-२२ मध्ये कोरोना काळ पूर्णपणे समाप्त झालेला नव्हता, परंतु याही परिस्थितीत कधी प्रत्यक्षपणे तर कधी आभासी पद्धतीने विविध उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना कृतीशील ठेवून आपली उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. विभागाच्या या सर्व उपक्रमांना नेहमीप्रमाणे विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला.

सत्र २०२१-२२ मध्ये विभागाद्वारा खालील उपक्रम राबविण्यात आले.

दि. २६-११-२०२१ रोजी विभागाद्वारा संविधान दिनानिमित्त्य परीक्षेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख व्हावी व त्यांच्यामध्ये संविधानाविषयी आदर निर्माण व्हावा या दृष्टिकोनातून ही परीक्षा घेण्यात आली. महाविद्यालयातील एकूण ३५ विद्यार्थ्यांची परीक्षेला उपस्थिती होती.

दि. १०-१२-२१ रोजी विभागाद्वारा जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त्य स्त्रिया व मानवी हक्क, या विषयावर महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. ज्योती सेलुकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.जी. टाले हे अध्यक्ष लाभले होते. प्रस्तुत व्याखानातून परंपरेपासून चालत आलेल्या स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन करून स्त्रियांसदर्भात असलेल्या कायद्यांची माहिती देण्यात आली.

दि. २५-०१-२२ रोजी मतदार दिवसानिमित्त्य ऑनलाईन प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली. मतदानाच्या अधिकाराविषयी व कर्तव्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जाणीवजागृती निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विविध महाविद्यालयातील ५२ विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.


तसेच मतदार दिवसानिमित्त्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी परिषद व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ द्वारा आयोजित मतदार दिवस कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून भारतीय लोकशाही व निवडणूका या विषयावर व्याख्यान.


दि. ११-०३-२२ रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त्य विभागाद्वारा ऑनलाईन राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रनिर्मितीत स्त्रियांचा सहभाग हा स्पर्धेचा विषय होता. संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यापीठातून स्पर्धेसाठी निबंध मागविण्यात आले होते व प्रथम, द्वितीय व तृतीय

रु.१००१, रु. ७५१ व रु. ३५१ असे तीन पारितोषिके घोषित करण्यात आली होती. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद विविध महाविद्यालयातून लाभला. एकूण ३२ निबंध विभागाला प्राप्त झालेत. यातून प्रथम क्रमांक औरंगाबाद विद्यापीठातील शासकीय अध्यापक महाविद्यालय, औरंगाबाद येथील प्रतिक्षा फंड यांनी पटकावला तर द्वितीय क्रमांक गोंडवना विद्यापीठाच्या शिवप्रसाद जयस्वाल महाविद्यालयाच्या गौति मेश्राम यांनी पटकावला आणि तृतीय क्रमांक अनुक्रमे नागपूर विद्यापीठाच्या कु. वैशाली रेवतकर बी.ए. भाग - रानी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, सावरगाव यांनी व औरंगाबाद विद्यापीठाच्या, शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या कु. तृप्ती सिरसाठ यांनी पटकावला. प्रस्तुत स्पर्धेच्या निबंधाच्या परीक्षणाचे कार्य निवृत्त प्रपाठक व माजी हंगामी प्राचार्य श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर येथील प्रा. डॉ. अलका देशमुख यांनी पार पाडले. आभासी पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करून गुगल पे द्वारा विजेत्यांना पारितोषिक रक्कम देण्यात आली.

*****













# अर्थशास्त्र विभाग

**डॉ. गजानन रा. सोमकुंवर**
**(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)**

महाविद्यालय स्थापनेपासून महाविद्यालयात अर्थशास्त्र अभ्यास मंडळ कार्यरत आहे. या मंडळातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. विद्यार्थ्यांना देशातील आर्थिक परिस्थिती, सरकारचे आर्थिक धोरण आंतरराष्ट्रीय धोरण व या परिसरातील आर्थिक स्थितीचे अध्ययन व्हावे व अर्थशास्त्रातील सखोल ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी या विभागातर्फे महाविद्यालयात व परीसरात विविध उपक्रम राबविले जातात.

या सत्रात २२ नाव्हेंबर २०२१ ला अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राचा विषय भारतीय अर्थव्यवस्था आव्हाने, संधी व धोरणे हा विषय होता. या चर्चासत्राचे उद्‌घाटन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष मा. जावधीया हे होते तर अध्यक्ष म्हणून संस्थेच्या अध्यक्षा मा. कुंदाताई विजयकार होत्या.

पहिल्या सत्रामध्ये प्रमुख वक्ता म्हणून डॉ. सुनील देशपांडे जी.एस. कॉमर्स कॉलेज, जबलपूर तर प्राचार्य धनवटे मॉडेल कॉलेज कारंजा हे होते तर दुसऱ्या सत्रामध्ये प्रमुख वक्ता म्हणून अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले सर होते तर या सत्राचे अध्यक्ष रा.तु.म. नागपूर विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. इंदूरवाडे होते. तिसऱ्या सत्रामध्ये पेपर वाचन ऑनलाईन करण्यात आले.

या सत्रातील काही काळ हा कोरोनामध्ये गेला. कोरोना वर्ग ऑनलाईन घेण्यात आलेले होते. त्यामुळे अभ्यासक्रम ऑनलाईन शिकविण्यात आलेला होता. ऑनलाईन वर्गाला मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती राहात होती व कोरोनाची स्थिती निवळल्यानंतर वर्ग नियमित सुरू झाले. तयानंतर महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने खालील कार्यक्रम राबविण्यात आले.

सत्र २०२१-२२ मध्ये विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील आर्थिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थी ज्या परिसरात राहतात त्या भागातील आर्थिक व सामाजिक समस्या लिहून आणून त्याचे वाचन सर्व विद्यार्थ्यांसमोर करण्यात आले व त्यावर काय उपाययोजना करता येईल याविषयी चर्चा करण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

दि. ४.१२.२१ ला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आधुनिक बँकिंग प्रणाली या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते बँक ऑफ बडोदा, खापरखेडा शाखाचे व्यवस्थापक राहुलजी मानकर होते तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. टाले होत. या व्याख्यानामध्ये राहुलजी मानकर यांनी आधुनिक काळात बँकेचे व्यवहार कसे चालतात व ई. बँकींग या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

दि. २५.०१.२२ ला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत व महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित मतदार दिन कार्यक्रमा अंतर्गत प्रमुख वक्ता म्हणून उपस्थिती.

दि. १४.०२.२२ ला मूल्य शिक्षण कार्यक्रमांतर्गत महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय पारशिवनी येथे आयोजित पर्यावरण शिक्षण या विषयावरील व्याख्यानासाठी प्रमुख वक्ता म्हणून उपस्थिती.

दि. १.३.२२ ला महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाक्षरे आयोजित सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त्य कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून उपस्थिती.

दि. २०.०४.२२ ला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाद्वारे बँक भेटीअंतर्गत बँक ऑफ बडोदा, खापरखेडा शाखा येथे भेट आयोजित करण्यात आलेली होती. या भेटीमागचा महत्त्वाचा उद्देश विद्यार्थ्यांना बँकेचे व्यवहार समाजचे तसेच आधुनिक काळात डीजीटल बँकींगचे व्यवहार कसे चालतात हे समजावे हा प्रमुख उद्देश होता. या भेटीमागे महाविद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांनी भाग घेतलेला होता.

दि. २५.०४.२२ ला अर्थशास्त्र विभागाद्वारे विद्यार्थी सेमिनार आयोजित केलेले होते. विद्यार्थ्यांना वर्गनिहाय विविध विषय देऊन त्या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण केले.

दि. २९.०४.२२ ला अर्थशास्त्र विभागाच्या वतीने भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप-कोरोनानंतर या विषयावर एक दिवसीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. सुनील घूगल अर्थशास्त्र विभाग प्रमुख तायवाडे महाविद्यालय, कोराडी हे होते तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी.टाले होते. कोरोना काळ व कोरोना नंतर भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला व भविष्यकाळात काय परिणाम होतील या विषयावर प्रमुख वक्ता व अध्यक्षांनी मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. गजानन सोमकुंवर यांनी केले तर आभार डॉ. राजेंद्र राऊत यांनी केले.

महाविद्यालयातील फॅकल्टी एक्सेंज कार्यक्रमांतर्गत महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय पारशिवनी येथे एक दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून उपस्थिती होती.

अर्थशास्त्राच्या नियमित वर्गात वर्गनिहाय गटचर्चाचे आयोजन करणात येते. यामध्ये या सत्रात बेरोजगारी, मंदी, आरोग्य, शेतीपुढील समस्या, शिक्षणबाजारीकरण इत्यादी विषयावर गटचर्चा आयोजित करण्यात आली होती.






# शारीरिक शिक्षण विभाग

**डॉ. राजेंद्र राऊत**
**(क्रीडा विभाग प्रमुख)**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात क्रीडेचे विशेष महत्त्व आहे. महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग १९९८-९९ पासून अतिशय उत्कृष्ठ कामगिरी करीत आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी विद्यापीठाद्वारे आयोजित आंतरमहाविद्यालयीन, आंतरविद्यापीठ, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावर विविध स्पर्धेत भाग घेत असतात. याकरिता खेळाडूंना नियमित सराव व मार्गदर्शन महाविद्यालयातील क्रीडा विभागातर्फे देण्यात येते. नियमित सरावातून नागपूर विद्यापीठ संघात निवड होण्याकरिता खेळाडू तयार करण्याचे काम प्रा. डॉ. राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनातून क्रीडा विभागाद्वारे १९९८ पासून करण्यात येते.

सत्र २०२१-२२ मध्ये रा.तु.म. नागपूर विद्यापीठ यांच्यातर्फे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा घेण्यात आल्या नाही. परंतु निवड चाचणी घेण्यात आली. तसेच सर्व खेळाडूंना मार्गदर्शन व सराव पाहून त्यांची वेगवेगळ्या खेळासाठी निवड करण्यात येते.

रा.तु.म. नागपूर विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन विविध स्पर्धा कोरोनामुळे रद्द करण्यात आल्या होत्या. परंतू निवड चाचणी करून त्यांनी काही खेळांना आंतरविद्यापीठ स्पर्धे सहभाग घेण्याकरिता चाचण्या घेतल्या. त्यामध्ये व्हॉलीबॉल, कबड्डी, रस्सी ओढणे, क्रॉसकंट्री इ. खेळ घेतले. त्यामध्ये आपल्या महाविद्यालयातील जयश्री ठाकरे, अभिनंदन खापनकर, व्हॉलीबॉल - कु. सपना कोल्हटकर, कबड्डी - प्राची चिकनकर (१० कि.मी.) क्रॉसकंट्री - अर्जुन वानखेडे, रस्सीखेच इ. विद्यार्थीनींनी नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. जयश्री ठाकरे, अभिनंदन खामनकर यांनी ऑल इंडिया, आंतरविद्यापीठ कबड्डी त. नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले तर प्राची चिकनकर यांनी आंतर विद्यापीठ स्पर्धेत नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. तसेच अर्जुन वानखेडे यांनी रस्सीखेच स्पर्धेत नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

*****

# इतिहास विभाग

**डॉ. उमेश जनबंधू**
**(इतिहास विभाग प्रमुख)**

१) बॅरि. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा येथे स्थापन झाल्यापासून महाविद्यालयात इतिहास विभाग कार्यरत आहे. या विभागा अंतर्गत इतिहास अभ्यास मंडळ विद्यार्थ्यांना कृतिशील करण्यासाठी नियमित प्रयत्नरत असते.

२) इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने वर्ष २०२१-२२ या सत्रात विविध कार्यक्रम महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आले.

३) ७ ऑगस्ट २०२२ ला इतिहास अभ्यास मंडळाची नवीन कार्यकारिणी तयार करण्यात आली. त्यात अध्यक्ष म्हणून कु. प्रणाली आबल्डिंगे, सचिव - अभिजीत सोनेकर तर सदस्य म्हणून कु. सुहानी पाटील, कु. मोनिका राऊत, अभिषेक डहाट, क्षितिज जनबंधू यांचा समावेश करण्यात आला.

४) नवीन कार्यकारिणीला नव्या सत्रातील शैक्षणिक जबाबदारी वाटून देण्यात आली.

५) इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना विविध विषय देऊन विषयावर आधारित स्पर्धा घेण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांनी चांगला सहभाग दर्शविला.

६) विद्यार्थ्यांचा चकित्सक, बौद्धिक विकास व्हावा म्हणून मंडळाच्या वतीने थोर विचारवंतांचे ग्रंथ विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी देण्यात आले. त्यावेळी ग्रंथांची उपयुक्तता समजावून सांगण्यात आली.

७) २६ नोव्हेंबर २०२१ हा संविधान दिवस मंडळाच्या वतीने साजरा करण्यात आला.

८) मंडळाच्या वतीने महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

९) दि. १७ फेब्रुवारी २०२२ ला महाविद्यालयात मंडळाच्या वतीने महात्मा बसवेश्वरांचे समाजसुधारणेचे कार्य या विषयावर भाषणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात प्रा.डॉ. जितेंद्र तागडे (पोरवाल महाविद्यालय कामठी) यांना मार्गदर्शनासाठी निमंत्रित करण्यात आले होते.

१०) मंडळाच्या वतीने सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांचे स्पेशल वर्ग घेऊन त्यांना परीक्षेसंबंधी विशेष मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी समजून घेण्यात आल्या व त्या सोडविण्यात आल्या.



# ग्रंथालय विभाग अहवाल

**प्रा.डॉ. संगीता चोरे**

**ग्रंथपाल**

“One best book is equal to hundred good friends but one best friend is equal to a Library”

**APJ Abdul Kalam**

भारताचे माजी राष्ट्रपती व मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी ग्रंथ हेच खरे गुरू असे म्हटले आहे. एक चांगले पुस्तक आपल्याला १०० मित्रांची बरोबरी करू शकते. ज्याप्रमाणे मानवी शरीरात हृदयाचे अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. तसेच कोणत्याही संस्थेचे ग्रंथालय हे हृदय समजल्या जाते. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रश्नांचे निराकरण करायचे असेल तर सर्वप्रथम सहाय्यभूत ठरतात व आठवतात ती म्हणजे ग्रंथालय होय. या ग्रंथालयात प्रवेश केल्यावर विभिन्न स्वरूपाची ग्रंथसंपदा पाहून खरोखरच जगाचा नवीन प्रवास करायला निघाल्याचा सुखद आनंद मिळतो. महाविद्यालयाच्या मूल्यमापन प्रक्रियेत ग्रंथालयाचे मूल्यमापन हा एक महत्त्वाचा घटक म्हणून ओळखला जातो.

माहिती क्षेत्रात अतिशय प्रचंड वेगाने प्रगती होत आहे. तसेच माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात ग्रंथालयात वापर वाढतो आहे. अशा परिस्थितीत सर्व माहिती कमीत कमी वेळात वाचकांपर्यंत पोहचविणे हे सर्वस्वी ग्रंथालयातर्फे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे.

**ग्रंथालय – एक दृष्टिक्षेप :**

सत्र २०२०–२०२१ वर्षापर्यंत ग्रंथालयात एकूण ८५ पुस्तकांचा साठा असून LIBMAN (MASTER SOFT WARE) या ग्रंथालय आज्ञावलीचा संगणीकरणाकरीता वापर करण्यात येतो जो मागील वर्षापासून क्लाऊड बेस मध्ये उपलब्ध झालेला आहे. लॅन द्वारा तीन संगणक जोडण्यात आले असून TSC-TIP-244PLUS बारकोड प्रिंटर व रीडरचा वापर करण्यात येतो.

विद्यार्थ्यांना हवी ती पुस्तके वेळेत मिळावी म्हणून OPAC (ONLINE PUBLIC ACCESS CATALOGUE) महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. आजचा वाचक हा मोबाईल व संगणकाच्या सान्निध्यातील असून ग्रंथालय अद्यावत रहावे व वाचकांचे देखील समाधान व्हावे म्हणून ग्रंथालयात N LIST (USC INFONET CONSORTIUM) चे सदस्यत्व घेण्यात आले आहे व त्याचे आय. डी. पासवर्ड व विद्यार्थ्यांना देण्यात आले आहेत.

**ग्रंथालयाची विशेषतः**

अ) ग्रंथालयात नवीन आलेल्या वाचन साहित्याची माहिती वाचकांना मिळावी म्हणून NEW ARRIVALS तयार करण्यात आले असून ग्रंथालयात प्रवेश करताच वाचकाच्या निदर्शनास पडेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

ब) दररोज ग्रंथालयात येणारे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची नोंद VISITORS REGISTER मध्ये घेण्यात येते.

क) विद्यार्थी तसेच प्राध्यापकांसाठी वेगवेगळी वाचनकक्ष (READING ROOM) तयार करण्यात आली आहे.

३) **ग्रंथालया मार्फत देण्यात येणाऱ्या सेवा :**

- संदर्भ सेवा
- देवाण घेवाण सेवा
- जर्नल्स/मॅग्झीम सेवा
- करंट अवेरनेस प्रोग्राम (सी.ए.एस.)
- झेरॉक्स सुविधा
- प्रिंटींग सुविधा
- एन. लिस्ट सर्विस
- ई- सेक्शन
- स्टुडंट अलर्ट सर्विस (एस.एम.एस.)
- पब्लिक सर्विस (बहिःशाल तसेच परिसरातील विद्यार्थी यांच्या विनंतीवरून त्यांना वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यात येते.)
- आय. आय. एल. (इंटर लायब्ररी लोन) चार महाविद्यालयासोबत (MOU) करण्यात आला आहे.
  ई - जर्नल्स - यात UGC - INFONET च्या N.LIST अंतर्गत येणाऱ्या E - JOURNALS चा समावेश होतो. यात खालील प्रकाशकांचा समावेश करण्यात आलेला आहे.
- - JSTOR
- - SPRINGER
- - TAYLER & FRANCIES
- - WILLEY BLACKWELL PULISHER

४) **ग्रंथालयात राबविण्यात येणाऱ्या हेल्दी प्रक्टीसेस :**

१) **उत्कृष्ठ वाचक पुरस्कार :**

विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा उत्साह वाढावा व ग्रंथालयातील जास्तीत जास्त वाचन साहित्याचा उपयोग त्यांनी करावा व ग्रंथालयाकडे त्यांचा ओढा असावा म्हणून ग्रंथालयातर्फे दरवर्षी हा पुरस्कार देण्यात आला.

२) **आंतर ग्रंथालयीन देवाण घेवाण :**

महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच स्टॉफ यांच्या मागणीनुसार समाधान शोधण्यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथालय चार महाविद्यालयासोबत MOU करून ही सेवा देत आहे.

३) **SPECIAL DEPOSIT SCHEME :**

परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना अभ्यासात कुठेही समस्या निर्माण होऊ नये म्हणून या योजने अंतर्गत आवश्यक ती कोणतीही दोन पुस्तके विद्यार्थ्यांना दिली जातात.

४) **वाचक प्रतिसाद : (USER FEEDBACK)**

ग्रंथालयातर्फे देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये काही उणिवा तर नाही अथवा विद्यार्थी तसेच स्टाफ यांच्यातर्फे काही सूचना असतील, ज्या ग्रंथालयासाठी उपयुक्त ठरेल अशा प्रतिक्रिया ''सूचना बॉक्स'' मध्ये टाकल्या जातात.

५) **LIBRARY WEB PAGE FOR INFORMATION DISSEMINATION :**

कोणत्याही संस्थेची वेबसाईट ही संस्थेची माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावित असते. आमच्या महाविद्यालयाची देखील http:bswc.edu.in यात ग्रंथालयाकरिता स्वतंत्र लिंक देण्यात आलेली आहे.

६) **ई –पेपर संच :**

सत्र २०१४–१५ पासून विद्यापीठ परीक्षांचे पेपर स्कॅन करण्यात आले असून विद्यार्थ्यांना त्यांचा वापर करता यावा म्हणून कम्प्युटर मध्ये अपलोड केलेले आहे. विद्यार्थी या सेवेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहे.

७) **SPECIAL ISSUE RETURN SCHEME :**

गरीब व हुशार विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार जास्तीची पुस्तके परीक्षेच्या काळात पुरविली जातात.

८) **LIBRARY ACTIVITIES :**

१) महाविद्यालयामध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या बी.ए. प्रथम व बी. कॉम. प्रथम च्या विद्यार्थ्यांकरिता Library Orientation Programme हा उपक्रम ग्रंथालय विभागाकडून दरवर्षी आयोजित करण्यात येतो. यामध्ये ग्रंथालयाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती मिळावी या हेतूने हा उपक्रम आयोजित केलेला असतो. यामध्ये ग्रंथालयाचे नियम, उपलब्ध

पुस्तकांची माहिती, देण्यात येणाऱ्या सेवा जसे Library OPAC, N-LIST, Online Free Journals इत्यादी संबंधी माहिती देण्यात येते.

२) १२ ऑगस्ट ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जन्मदिवस 'ग्रंथपाल दिवस' म्हणून साजरा केला जातो.

३) माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून १५ ऑक्टोबर २०१९ ला साजरा करण्यात आला. याप्रसंगी १०० विद्यार्थ्यांना पुस्तकाचे मोफत वितरण करण्यात आले.

४) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र ग्रंथालयाचा एक भाग असून विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन विभिन्न कार्यक्रमाचे आयोजन केले जातात.


५) ग्रंथालयाची Library Advisory Committee तयार करण्यात आली असून ग्रंथालयाच्या महत्त्वपूर्ण कामकाजात महत्त्वाची भूमिका निभवते. यात विद्यार्थ्यांना देखील सदस्यत्व देण्यात आले आहे.


**ग्रंथालयातील ग्रंथाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| एकूण ग्रंथाची संख्या | – | ९४५९ |
| देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | – | ८३८ |
| सत्र २०२०–२१ ला खरेदी केलेली पुस्तके | – | २०३ |
| जर्नल्स | – | ९ |
| मॅग्झीन्स | – | १० |

N-LIST (ONLINE JOURNALS)-6000 + e-Journals and 31, 35000+e-books.

*****



# सांस्कृतिक विभाग अहवाल

प्रा.डॉ.प्रतिभा गडवे-दातीर
समन्वयक

**सत्र २०२१–२२ या वर्षा विभागाद्वारा महाविद्यालयात खालील कार्यक्रम घेणात आले.**

## स्व. बाबासाहेब केदार पुण्यतिथी – २ ऑगस्ट २०२१

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे संस्थापक व पूर्वाध्यक्ष सहकार महर्षिबाबासाहेब केदार यांच्या पुण्यतिथी निमित्त्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी.टाले हे अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाच्या नॅक समन्वयक व ग्रंथपाल प्रा.डॉ. संगीता चोरे या होत्या.

## ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा – ८ सप्टेंबर २०२१

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाद्वारा नुकताच पारपडलेला शिक्षक दिन व ८ सप्टेंबर २०२१ च्या जागतिक साक्षरता दिूच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचा विषय होता-कोरोना काळातीलशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. टाले यांच्या अध्यक्षतेखाली व महाविद्यालयाच्या मराठी विभागप्रमुख डॉ. अंजली पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम घेण्यात आला.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी – ११ ऑक्टोबर २०२१

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. टाले यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. गजानन सोमकुंवर हे प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

## संविधान दिवस (उद्देशपत्रिका वाचन) – २६ नोव्हेंबर २०२१

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाद्वारा दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी संविधान दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. टाले यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. २६ नोव्हेंबर हा दिवस भारतात संविधान दिवस म्हणून साजरा केला. या निमित्त्याने महाविद्यालयातदेखील संविधान दिवस कार्यक्रम घेऊन उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन – ६ डिसेंबर २०२१

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाद्वारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. टाले यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ. जनबंधू यांना प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

## संत गाडगे महाराज पुण्यतिथी – २० डिसेंबर २०२१

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाद्वारा संत गाडगेबाबा पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. टाले यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ता म्हणून मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. अंजली पांडे यांना आमंत्रित केले होते.

## सावित्रीबाई फुले जयंती – ३ जानेवारी २०२२

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाद्वारा ३ जानेवारी रोजी आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रस्तुत कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. टाले यांच्या अध्यक्षतेखाली व अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. गजानन सोमकुंवर यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.

## जागतिक महिला दिवस – ८ मार्च २०२२

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. टाले यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रम घेण्यात आला. पारशिवनी पंचायतसमिती माजी सभापती श्रीमती सुषमाताई शहाणे यांना प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.











# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**डॉ. राजेंद्र राऊत, डॉ. उमेश जनबंधू**

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना युनिट कार्यरत आहे. या विभागामार्फत वर्षभर विविध, शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रम राबविले जातात. सत्र २०२१ ते २०२२ मध्ये पुढीलप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात आले...

१) जागतिक लोकसंख्या दिवस दि. ११ जुलै २०२१ ला साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.जी. टाले सर होते. या प्रसंगी वक्ता म्हणून डॉ. ज्योती सेलूकर हजर होत्या. त्यांनी लोकसंख्या दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. राजेंद्र राऊत यांनी केले तर आभार डॉ. उमेश जनबंधू यांनी मानले. या कार्यक्रमाला बहू संख्येने विद्यार्थी हजर होते.

२) परिसर स्वच्छता व वृक्षारोपण कार्यक्रम दि. ४ ऑगस्ट २०२१ ला महाविद्यालयाच्या परिसरात घेण्यात आले. रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांकडून स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. सामाजिक वनीकरण विभागाकडून आणलेले १०० वृक्ष महाविद्यालयाच्या परिसरात सभोवताल लावण्यात आली.

३) साक्षरता दिवस ९ सप्टेंबर २०२१ ला साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.जी. टाले सर उपस्थित होते. यावेळी डॉ. संगीता चोरे यांनी साक्षरतेचे महत्त्व समजावून सांगितले.

४) राष्ट्रीय सेवा योजना दिवस दि. २४ सप्टेंबर २०२१ ला साजरा करण्यात आला. सोबत बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांची जयंती असल्याने त्या दिवशी रक्तदान शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. टाले सर आणि लाईफ लाईन ब्लड बँक नागपूर चे डॉक्टर व नर्स हजर होते. याप्रसंगी डॉ. टाले सरांनी बॅ. वानखेडे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला तर इतर पाहुण्यांनी रक्तदानाचे महत्त्व समजावून सांगितले. ७० विद्यार्थ्यांनी यावेळी रक्तदान केले. या कार्यक्रमाचे संपूर्ण संचालन प्रा. उमेश जनबंधू यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. राजेंद्र राऊत यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी हजर होते.

५) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची पुण्यतिथी दि. ११ ऑक्टोबर २०२१ ला साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. सोमकुवर आणि प्रा. पांडे यांनी मार्गदर्शन केले.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिवस ६ डिसेंबर २०२१ ला साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. टाले सर यांनी मार्गदर्शन केले. सोबतच प्रा. डॉ. उमेश जनबंधू यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी हजर होते.

७) स्वच्छ व स्वस्थ भारताकरिता युवाशक्ती या घोषवाक्यानुसार राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबीर दि. २३/३/२०२२ ते २६/३/२०२२ या दरम्यान मु. आदासा, ता. सावनेर, जि. नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उद्‌घाटन मा. सुनिलबाबू केदार (मंत्री महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते करण्यात आले तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. अतुल लोंढे, श्रीमती रश्मी बर्वे (अध्यक्ष जिल्हा परिषद, नागपूर) मा. बाबाराव कोढे, महेंद्र डोंगरे, प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, डॉ. आर.जी. टाले, मा. सोपानदेव पिसे (संचालक रा.से.यो., नागपूर विद्यापीठ) श्रीमती नितूताई बावणे (सरपंच) मा.बबनराव तायवाडे इ.च्या उपस्थितीत उद्‌घाटन कार्यक्रम पार पडला.

*****

# स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगार विभाग


**प्रा.डॉ. संगीता रा. चोरे**
**समन्वयक**
**स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगार विभाग**

आजच्या युवा पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान जर कोणते असेल तर ते म्हणजे रोजगार होय. शिक्षण व योग्य कौशल्य असून देखील त्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करण्याची संधी उपलबध होऊ शकत नाही. आपली उपजीविका चालविण्यासाठी पैसे कमावणे आवश्यक असते व त्यासाठी नौकरी अथवा उद्योगाची जोड असावी लागते. परंतू योगय माहिती अभावी त्याला ते प्राप्त करणे कठीण जाते. तेव्हा बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना हव्या असलेल्या आवडीच्या क्षेत्रात जाता यावे म्हणून स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास व व्यावसायिक दृष्टिकोन समोर ठेऊन विद्याथी सहज यश प्राप्त करू शकेल असे उपक्रम या विभागाद्वारे राबविले जातात. यात नामवंत व तज्ञ मार्गदर्शकांना आमंत्रित करून माहिती दिली जाते. सत्र २०२१-२२ मध्ये महाविद्यालयातर्फे राबविण्यात आलेले उपक्रम खालीलप्रमाणे आहेत.

१) "Wealth Awareness Program" दि. २३/११/२०२१ रोजी ऑनलाईन वेबिनार झूम माध्यमातून घेण्यात आला. यात SEBI चे सहकार्य प्राप्त झाले. महाविद्यालयातील ८५ विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.

२) "Workshop on Creative arts" दि. २०/१२/२०२१ रोजी ऑनलाईन वेबिनार झूम माध्यमातून घेण्यात आला. यात ZICA INSTITUTE चे सहकार्य प्राप्त झाले. महाविद्यालयातील ८५ विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.

*****



# महिला विभाग

## २०२१-२२

**समन्वयक**
**प्रा.डॉ. अंजली पांडे**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ व महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा येथे महिला कल्याण व विकास विभागाची स्थापना करण्यात आली होती. या विभागाद्वारे महाविद्यालयातील मुलींच्या तक्रारी व समस्यांची नोंद घेण्यात येते. तसेच या समस्यांच्या निराकरणार्थ योग्य ती पाऊलेही उचलली जातात. त्यांना मार्गदर्शन करणे, आकस्मिक वैद्यकीय सेवा पुरविणे, त्यांना कायदेविषयक मार्गदर्शन करणे, त्यांना शारीरिक व मानसिक दृष्ट्या सबल करण्यासंदर्भात मार्गदर्शन करणे इत्यादी उपक्रम या विभागाद्वारे राबविले जातात.

महाराष्ट्र शासनाच्या मिशन युवा स्वास्थ्य योजनेंतर्गत बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा येथील विमेन्स सेल आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, चिचोली यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कोरोना लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरात महाविद्यालयातील अठरा वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे कोविड १९ लसीकरण करण्यात आले.

या सत्रात विद्यार्थ्यांसाठी ४ जाने. २०२२ रोजी सुरक्षा अभियान हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी खापरखेडा पोलिस स्टेशनचे ठाणेदार श्री मिश्रा साहेब प्रमुख वक्ते म्हणून उपस्ति होते. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना कोरोनाविषयक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या आरोग्य व आयुष्य सुरक्षेसाठीच पोलिसांतर्फे शासनाकडून हे अभियान सर्व शाळा, महाविद्यालयातून राबवण्यात येते असल्याचे त्यांनी सांगितले. श्री. पवार, वाहतूक नियंत्रण शाखा, खापरखेडा यांनी विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा विषयक माहिती दिली.

बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'हत्तीरोग निर्मूलन अभियान' ३ मार्च २०२२ रोजी राबविण्यात आले. याप्रसंगी चिचोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वीणा वासनिक, रुबीना शेख या उपस्थित होत्या. वीणा वासनिक यांनी हत्तीरोग कारणे व उपाययोजना या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महिला दिनाचे औचित्त्य साधून बॅरि. शेषराव वानखेडे कला वा वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा येथे विमेन्स सेलतर्फे 'महिला संरक्षण आणि कायदेविषयक जागृती' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ॲडव्होकेट सोनाली सावरे, गाडवे उपस्थित होत्या. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी. टाले हे होते.

बॅरि. शेषराव वानखेडे कला वा वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा येथे आरोग्य अभियानांतर्गत 'कॅन्सर मुक्त भारत' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सोनेकर व इंजि. प्रशांत नायडू उपस्थित होते.

बॅरि. शेषराव वानखेडे कला वा वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा येथे विमेन्स सेलतर्फे 'भारतीय सैन्यात महिलांचा सहभाग' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रहार या संस्थेच्या विश्वस्त व संचालक शिवाली देशपांडे उपस्थित होत्या. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे डॉ. आर.जी. टाले हे होते.

बॅरि. शेषराव वानखेडे कला वा वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा येथे विमेन्स सेल आणि संयोगिता लेडिज क्लब, खापरखेडा यांचयासंयुक्त विद्यमाने 'ग्रामीण महिला विकास' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ज्योती सेलूकर उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून रश्मी दरियानी, आयकर अधिकारी, प्रियंका उपासे, उपसरपंच भानेगाव तसेच अध्यक्षस्थानी स्मिता जैन, तनिष्का महिला मंडळ या उपस्थित होत्या.

या विभागाद्वारे राबविण्यात येत असणाऱ्या स्तुत्य व वैविध्यपूर्ण उपक्रमाविषयीचे अभिमत विद्यार्थीनींनी प्राचार्यांकडे व समन्वयकांकडे नोंदविले. महाविद्यालयातील हा विभाग नेहमीच विद्यार्थिनींच्या हितजोपासनेची बांधिलकी जपतो.



राज्यशास्त्र विभाग व्दारा आयोजित
राज्यस्तरीय आंतर विद्यापिठ
आंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धा

# पुरस्कार प्राप्त निबंध

# प्रथम क्रमांक प्राप्त

## राष्ट्रनिर्मितीत स्त्रियांचा सहभाग

**प्रतिक्षा नारायण फंड**
**डी.एड. प्रथम वर्ष**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय, औरंगाबाद**

स्त्री ती सनातन शक्ती आहे जी अनादी काळापासून सामाजिक कर्तव्यांचे वहन करत आली आहे. ती कर्तव्ये जी पार पाडण्यास पुरुष असमर्थ असतात. ममता, करुणा, वात्सल्य, सहृदयता या गुणांनी स्त्रिया युक्त असतात. कोणत्याही राष्ट्राच्या निर्मितीत त्या राष्ट्रातील निम्म्या लोकसंख्येच्या भूमिकेला कोणीही नाकारू शकत नाही. कोणत्याही कारणाने जर ही निम्मी लोकसंख्या निष्क्रिय असेल तर ते राष्ट्र किंवा समाज उल्लेखनीय प्रगतीची कल्पनाही करू शकणार नाही.

आपल्या संस्कृतीमध्ये जे-जे काही चांगले, पवित्र, उदात्त आहे ते सर्व स्त्रियांच्या सहभागाने साध्य झाले आहे. वेदांतील कित्येक ऋचा स्त्रियांनी रचलेल्या आहेत. लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी, अपाला ही काही जात नावे आहेत. सामान्य भाषेत वेद म्हणजे ज्ञान होय. वेद म्हणजे पुरातन ज्ञान-विज्ञानाचे भांडार होय. माणसाच्या प्रत्येक समस्येचे समाधान वेदांमध्ये आहे. भारतीय संस्कृती ही वेदांवर आधारित संस्कृती मानली जाते. या वेद निर्मितीतील स्त्रियांचा सहभाग आपल्याला स्त्रियांचा संस्कृती निर्मितीतील म्हणजेच राष्ट्र निर्मितीतील सहभाग दर्शवितो.

जसजसा काळ पुढे गेला तसतसे भारतीय समाजात उत्तरवैदिक काळापासून स्त्रियांची स्थिती कमकुवत होत गेली. मध्यकाळापर्यंत तर अनेक कुप्रथांमुळे स्त्रियांची स्थिती अधिकच खालावत गेली, परंतू या काळातही मौर्य साम्राज्याचे नाव (मौर्य) हे महान सम्राट चंद्रगुप्त मौर्याची आई मुरा हिच्या नावावरून ठेवले गेले. सातवाहन राजे आपल्या नावापुढे आईचे नाव लावत, उदा. गौतमीपुत्र सातकर्णी. यावरून आपणांस स्त्रियांचा प्रभाव दिसून येतो. कोणत्याही कुटुंबात परिणामी समाजात स्त्रीची भूमिका ही अतिशय महत्त्वाची असते. यातूनच पुढील पिढी संस्कारी बनते, नैतिक मूल्ये पुढील पिढीत रुजवली जातात.

राजमाता जिजाऊंनी बाल शिवबावर संस्कार केल्यामुळेच राज्याला छत्रपती लाभला. शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची जाणीव निर्माण करून देण्यासाठी जिजाबाईंनी त्यांना रणनीती शिकवली. समान न्याय देण्याची वृत्ती, धाडास, चिकाटी, स्वराज्य प्राप्त करण्याची जिद्द आणि अन्याय करणाऱ्याला कठोर शिक्षा देण्याचे धाडस त्यांनी शिवरायांना दिले. जिजाऊंच्या शिकवणीमुळे राष्ट्रात स्वाभिमान व स्वधर्म टिकून राहिला.

भारताचा पहिला स्वातंत्र्यसंग्राम म्हणजे १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध म्हटले की, आपल्याला झाशीची राणी आठवते. राणी लक्ष्मीबाईंनी फक्त युद्धाचे नेतृत्व केले नाही तर मध्यप्रदेशातील स्त्रियांना युद्धाच्या कामात सहभाग घेण्यास प्रेरणा व उत्तेजन दिले. त्यांच्या दासी काशी व सुंदर या युद्धकलेत प्रवीण होत्या. राणीने स्त्रियांचा एक गट लढाईचे शिक्षण देऊन तयार केला. ललीता बक्षी नावाची एक प्रसिद्ध घोडेस्वार राणीच्या सेनेत होती. फुलकारी नावाची दलित महिला गस्त घालणे, दवंडीकाम करणे या कामात वाकबगार होती. लढाईचा आराखडा व सैन्याचा व्यूह रचणात मोतीबाईंचा सल्ला महत्त्वाचा मानला जात असे. अझीझन नावाची कलावंतीण ब्रिटीशांच्या सैन्यातून

बातम्या काढून आणण्याचे काम करीत असे. या सर्व स्त्रियांनी १८५७ साली या देशाच्या स्वातंत्रासाठी आपले प्राण अर्पण केले.

लक्ष्मीबाईप्रमाणेच एक बादशाहीण व अनेक राण्यांनी आपले ऐशोआरामाचे जीवन सोडून १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात सामील झाल्या होत्या. झीनत महल ही दिल्लीचा शेवटचा बादशहा बहादूरशहा जफर यांची पत्नी होत्या. त्यांनी कधीही आपल्या लाल किल्ल्याबाहेर डोकावूनही पाहिले नव्हते. बादशाहीण या नात्याने बेगमने लोकांना आपले मतभेद मिटवून एक होण्याचे आवाहन केले. या आवाहनाचा लोकांवर खूप मोठा प्रभाव पडला.

बेगम हजरत महल ही अवधचा नवाब वाजिदअली शहा यांची पत्नी. वाजिदअली शहा राजाच्या जीवनापेक्षा कलावंतांचे जीवन अधिक पसंत करीत. परिणामी ब्रिटीशांनी त्यांचे राज्य खालसा केल्याबरोबर त्यांनी पाठविलेल्या ठिकाणावर ते निघून गेले. बेगमने त्यांच्याबरोबर न जाता अवधवर ताबा ठेवून इंग्रजांबरोबर लढणे पसंत केले. राणी व्हिक्टोरियाने प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्याला तिने सडेतोड उत्तर दिले. इंग्रजांशी तिने निकराने झुंज दिली. ८१५९ पर्यंत ती इंग्रजांना चकवत राहिली. तात्या टोपे व नानासाहेब पेशव्यांसारखे मातब्बर नेतेही अखेर तिच्याच आश्रयाला आले होते. एवढ्या मोठ्या साम्राज्याशी टक्कर देणे ही काय मामुली बात आहे ?

मद्रास प्रांतातील शिवगंगा नावाच्या छोट्या संस्थानाचा राजा बटुकनाथदेवर यांची राणी वेलुंचीयार हिने ब्रिटीशांना आपल्या युद्ध कौशल्याने हैराण केले. ब्रिटीशांनी तिच्यापुढे हात टेकले व तिला हटविण्यासाठी डाकू कटू याची मदत घेतली.

१८५७ इंग्रजांनी होळकरांचा महिदपूर येथे मोठा पराभव केला. या लढाईचे नेतृत्व राणी भीमाबाईने स्वीकारले होते. पराभव झाला म्हणून खचून न जाता राणीने जंगलाचा आश्रय घेऊन परत आपल्या सैन्याची रचना केली. गनिमी-काव्यात लढून तिने इंग्रजांना जेरीस आणले.

कर्नाटकातील कित्तूर संस्थानातील अलोट संपत्तीची माहिती मिळाल्यावर ब्रिटीशांनी कित्तूरवर हल्ला केला. या संस्थानाची राणी चेन्नम्माने इंग्रजांचा धुव्वा उडविला. १८५७ साली महाराष्ट्रातील नरगुन्द नावाच्या छोट्या संस्थानातील राण्यांनीही ब्रिटीश राज्याच्या विरोधात शस्त्र उचलले व त्या शहीद झाल्या.

१९ व्या शतकातील या सुकन्यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान केले. त्यांची कथा खरोखरच प्रेरणादायी आहे.

१८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाल्यावर ५-६ वर्षातच काँग्रेसच्या अधिवेशनाखाली महिला जाऊ लागल्या. पंडिता रमाबाई यांच्या नेतृत्वाखाली १८९२ साली बंगाल व महाराष्ट्रातून मिळून ८-१० महिला पहिल्या प्रथम काँग्रेसच्या अधिवेशनाला गेल्या. घराच्या बाहेरील सार्वजनिक कामात भारतीय महिलांचे हे पहिले पाऊल पडले. यानंतर दरवर्षी काही महिला आपला पती अगर पित्याबरोबर काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाला हजर राहू लागल्या. परंतू या स्त्रिया समाजाच्या निंदेच्या भयाने अधिवेशनात भाग घेत असत. 'तुम्ही घ्या ना भाग, तुम्ही बोला ना' असा आग्रहही त्यांना कुणी करत नसे.

श्रीमती कादंबिनी गांगुली हिने प्रथम व्यासपीठावर जाऊन बोलण्याचे धैर्य केले. महिलांसाठी व्यासपीठाचा दरवाजा तिने उघडून घेतला. आपल्या भाषणात तिने 'महिलांना काँग्रेसच्या कामकाजात भाग घ्यायचा अधिकार मिळालाच पाहिजे' या मुद्द्यावर जोर दिला. "महिला म्हणजे काही कचकड्याच्या बाहुल्या नाहीत. पुढच्या वर्षीच्या अधिवेशनात तुम्ही बायकांचे पुतळे जागोजागी उभे करा. आम्ही आता इथे पुतळे बनवणासाठी येणार नाही." असे तिने जोरात ठणकावले. कादंबिनीबाईंच्या भाषणाचा काँग्रेस कार्यकर्त्यांवर खूप प्रभाव पडला आणि स्त्रियांची अबोल भावना बोलकी झाली.

सावरकरांच्या वडील वहिनी येसू वहिनींनी अभिनव भारत संघटनेतील कार्यकर्त्यांच्या बायकांची 'आत्मनिष्ठ युवती संघ' नावाची संघटना स्थापन केली. या स्त्रियांनी स्वदेशीचे व्रत घेतले व त्याचा प्रसार केला.

काचेच्या बांगड्यांचा चुडा भरणे हे सुवासिनींचे प्रमुख लक्षण, आपल्या देशात पूर्वी काच बनत नसे. बांगड्या विदेशी असल्यामुळे सुवासिनींचे बांगड्या हे आवश्यक लक्षण असूनही त्यांनी हातात काचेची बांगडी घालायचे सोडले. साखर परदेशी म्हणून तीही सोडली.

विसाव्या शतकातील पहिली जगप्रसिद्ध स्त्री स्वातंत्र्यसैनिक म्हणजे मादाम कामा. लंडनला श्यामजी कृष्ण वर्मा व स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या क्रातिकारकांशी त्यांचा परिचय झाला. त्या अभिनव भारत संघटनेत सामील झाल्या. जर्मनीतील स्टुटगार्डमधील आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत त्यांनी स्वतःच्या कल्पनेने स्वतंत्र भारताचा झेंडा बनवून तो फडकविला (१९०७). या परिषदेतील सदस्यांना भारताबद्दल माहिती दिली.

अवन्तिकाबाई गोखलेंनी गांधीजींबरोबर चंपारण्यात सत्याग्रह केला. १९३० मध्ये सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी स्त्रियांनाच नव्हे तर पुरुषांनाही मार्गदर्शन केले. हंसाबेन मेहता यांनी सायमन कमिशनला सक्रिय विरोध केला. सरोजिनी नायडू यांनी सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घ्यायचे ठरविले, दांडी यात्रेत त्या सहभागी झाल्या. १९४९ मध्ये त्या भारतातील पहिल्या महिला राज्यपाल होत. ॲनी बेझंट यांनी भारतात होमरूल चळवळ सुरू केली.

सरलादेवी चौधरी या रविंद्रनाथ टागोरांची नात. बंगाल व पंजाबमधील क्रांतिकारकांच्या शक्तीला एकत्र आणण्याचे काम त्यांनी केले. देशभक्ती त्यांच्या नसानसात भरलेली होती. १ जानेवारी १९०९ रोजी लाहोरमध्ये त्यांनी प्रथम वंदे मातरम्‌ची घोषणा देऊन नववर्ष साजरे करणाकरिता जमलेल्या लोकांना चकीत केले. वंदे मातरम् या घोषणेला बंदी असतांना त्यांनी ती घोषणा दिली. यावरून त्यांचे अतुल धैर्य दिसून येते. १९१९ पासून त्या गांधीजींच्या प्रभावाखाली आल्या. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास व नेतृत्व गुण वाढावे यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

शस्त्रास्त्रांचा वापर केल्याशिवाय स्वराज्य मिळणार नाही, असा विचार असणाऱ्याही काही स्त्रिया या देशात होत्या. त्यांचा स्वातंत्र्याचा मार्ग म्हणजे क्रांतीचा मार्ग. या मार्गात हिंसा अटळ होती व ती त्यांना मान्य होती. पंजाबची सत्यवती देवी ही अशाच स्त्रियांमधील

दुसरी पंजाबमधील क्रांतिकारक विचारांची कन्या सुशीलादीदी. आपले सर्व दागिने तिने काकोरी खटला चालविण्यासाठी दिले होते. सरदार भगतसिंग व इतर क्रांतिकारकांना तिने भूमिगत राहून मदत केली, तिला पकडून देणाऱ्याला सरकारने रु.२000 चे बक्षीस लावले होते. क्रांतिकारक तिचा सल्ला घेत. पोलिसांचा एखाद्या योद्धाप्रमाणे ती सामना करी.

१९३२ साली बंगालमधील बिना दास पदवी घेण्यासाठी व्यासपीठावर चढली असतांना बंगालचे गव्हर्नर स्टॅनले जॅकसनवर तिने गोळ्या झाडल्या. बीनाला ९ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. “मी माझ्या मातृभूमीवरील प्रेमामुळे ब्रिटीश अधिकाऱ्यांवर पिस्तुल झाडले. तुम्ही द्याल ती शिक्षा मला मंजूर आहे”, असे बाणेदार उत्तर बीनाने न्यायाधीशाला दिले होते.

देशप्रेमाने पेटलेल्या या मुलींनी धोक्याचे जीवन पत्करले, हालअपेष्टा व अनेक वर्षांचा तुरुंगवास पत्करला. त्यांच्यासमोर एकच ध्येय होते. मातृभूमीची परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्तता.

१९४२ च्या आंदोलनात उषा मेहता, सुचेता कृपलानी, अरुण असफ अली, मृदुला साराभाई, सवित्री मदन, पद्मजा नायडू, किसन घुमटकर, मृणालिनी देसाई, अनसूया लिमये, अहिल्या रणदिवे इ. युवतींनी स्वतःला झोकून दिले.

सुभाषबाबूंनी आझाद हिंद सेनेत ‘राणी झाशी’ नावाची पलटन उभी केली. १३ वर्षाच्या माया गांगुलीपासून ४० वर्षाच्या एम. सत्यवती थीवरपर्यंत सर्व वयाच्या स्त्रिया पलटणीत सामील झाल्या. त्यांची संख्या १५०० पर्यंत

होती. एके दिवशी प्रौढ वयाच्या १०-१२ तामिळ बायका नेताजींकडे गेल्या. त्यांना फौजेत दाखल व्हायचे होते. नेताजी म्हणाले, “सैन्यात भरती होण्यासाठी वयाची अट असते. तुम्ही सर्व प्रौढ आहात. तुम्हांला मी भरती करून घेऊ शकत नाही, मला माफ करा.” त्यावेळी एक बाई म्हणाली, “नेताजी सैन्य लढतात, त्यांना भूक असते ना ? आम्ही जेवण बनवू, भांडी घासू. त्या कामासाठी तर वय आडवे येत नाही ना ?”

या सर्वांच्या भगीरथ प्रयत्नांनी भारताचे स्वातंत्र्य हे पूर्ण स्वातंत्र्य झाले. भारतातील स्त्रियांचा लढ्यातील सहभाग हे भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासातील सोन्याने लिहिलेले पान आहे. आपल्या या देश-विदेशातील भगिनींनी पुरुषांपेक्षा आम्ही कमी नाही, पण काकणभर सरसच आहोत, हे सिद्ध केले.

आधुनिकतेबरोबरच शिक्षणाच्या प्रसाराने महिलांच्या स्थितीतही सुधार झाला. सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य अनमोल आहे. याचा परिणाम म्हणजे देश प्रगतीपथावर अग्रेसर झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रियांनी आपले सामाजिक व राजकीय स्थान सदैव सुदृढ ठेवले आहे. भारताच्या पहिल्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे योगदान अविस्मरणीय आहे.

राजकारण, समाजकारण, शेती, शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा आदी क्षेत्रांमध्ये स्त्रियांचे नेतृत्व व कर्तृत्व सिद्ध होत आहे. राष्ट्र निर्मितीत स्त्रियांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे कुटुंब सांभाळणे. कोणत्याही समाजात घर आणि मुलांना सांभाळणे हे एक सर्वात महत्त्वपूर्ण दायित्व होय आणि स्त्रिया हे दायित्व पूर्ण क्षमतेने पार पाडतात. जर घरातील स्त्री शिक्षित असेल तर येणाऱ्या पिढ्या देखील सुशिक्षित होतील व राष्ट्र अधिक सुदृढ बनेल, यशाच्या नवनवीन शिखरांना स्पर्श करेल..

निश्चितच स्त्रियांनी विविध संकटांच्या व्यतिरिक्त नवनवीन शिखरे सर केली आहेत. घराव्यतिरिक्त बाहेरही तिने स्वतःचे अबाधित असे स्थान निर्माण केले आहे, परंतू याव्यतिरिक्तही समस्या कायम आहेत. या सर्व समस्यांना तोंड देत निश्चितच नारी स्वतःचा आणि राष्ट्राचा उत्कर्ष स्थापण्यात सदैव कार्यरत राहील, राष्ट्र निर्मितीत सदैव आपले योगदान देत राहील.

शेवटी तुकडोजी महाराजांच्या ओवीद्वारे सदिच्छा !

तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो । सकळांचे लक्ष तुझकडे वळो ।
मानवतेचे तेज झळझळो । विश्वामाजि या जोगे ।।

# द्वितीय क्रमांक प्राप्त

## राष्ट्र निर्माण मे महिलाओं की भागीदारी

**कार्तिक गौतम मेश्राम**
**बी.ए. भाग ३**
**शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय,**
**अर्जुनी मोर**

**" देश की वीरांगनाएँ भी वीरों से कम नहीं,**
**मर मिटी है देश पर तनिक भी उनको गम नहीं**
**राष्ट्र के निर्माण में भागीदारी उनकी कल भी थी**
**आज भी है कल भी होगी, उनको किसी का डर नहीं। "**

**प्रस्तावना ः-**

राष्ट्रनिर्माण में आधुनिक भारत का प्रारंभ हो। जीजाबाई जिन्हें रानी माँ के रूप में भी जाना जाता है और झाशी की रानी लक्ष्मीबाई इनसे होता है।

किसी भी राष्ट्र के विकास और प्रसिद्धी के लिए किए गये कार्य राष्ट्र निर्माण के अंतर्गत आते है। राष्ट्र निर्माण एक बहुत ही अच्छा कार्य है। राष्ट्र के हित में जो भी कार्य बेहद किया जाए कम है। इतिहास गवाह है कि राष्ट्र के लिए बलिदान किया होनेवाले वीरों के साथ साथ नारियाँ भी पिछे नहीं है। राष्ट्रीय भावनाओं से ओतप्रोत नारियों के बलिदान की गौरव गाथाएँ प्रत्येक देश के इतिहास को गौरवान्वित करती है।

किसी भी राष्ट्र के निर्माझ में उस राष्ट्र की आधी आबादी अर्थात् स्त्री की भूमिका की महत्ता से इन्कार नहीं किया जा सकता। आज की नारी पुरुषों के कन्धे से कन्धा मिलाकर आगे बढ रही है और देश को आगे बढा रही है। सुभाषचन्द्र बोस ने कहा भी है-

"ऐसा कोई भी कार्य नहीं, जो हमारी महिलाएँ नहीं कर सकती और ऐसा कोई भी त्याग और पीड़ा नहीं है, जो वे सहन नहीं कर सकती।"

आज स्त्रियों ने अनेक सामाजिक एवं आर्थिक कठिनाइयों को पार करते हुए नई बुलन्दियो को छुआ है।

**राष्ट्र निर्माण में नारी की भागीदारी और भूमिका ः-**

हमारे यहाँ शास्त्रों में कहां गया है कि,

"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता"

अर्थात् जहाँ नारी का सम्मान होता है वहाँ देवताओं का वास होता है। जिस समाज में नाही बढ़ चढ़कर विभिन्न क्षेत्र से सम्बन्धित कार्यो में हिस्सा लेती है वहाँ न्रगति की संभावनाएँ अत्यंत बढ़ जाती है। घर गृहस्थी का निर्माण हो या राष्ट्र का निर्माण हो नारी के योगदान के बिना कोई भी निर्माण पूर्ण नहीं हो सकता। आजादी के समय

से लेकर आजतक समाज व राष्ट्र के नवनिर्माण में महिलाओं ने पुरुषों के साथ कंधे से कंधा मिलाकर सक्रिय सहभागिता निभाई है। भारत देश में पहली तीन महिला वायुसेना पायलट थी; जो महिलाओंद्वारा हासिल किया गया एक और मील का पत्थर है और एव्हरेस्ट फतह करने से लेकर अंतरिक्ष में उडान भरनेवाली व देश की सत्ता में सरकारी ओहदो की शोभा बनाती महिलाओं ने नारी शक्ती का गौरव बढाया है।

**राष्ट्र निर्माण में नारी की भागीदारी और भूमिका :-**

साहित्य के क्षेत्र में नारी के सार्थक योगदान को बिल्कुल भी नकारा नहीं जा सकता। साहित्य जब तक भौक्तिक का हिस्सा था तब तक लेखन में स्त्रियों की भागीदारी बराबर स्तर पर रही। आज के दौर में महिलाओं ने पुरुष के मुकाबले साझेदारी निभाई है। महिलाओ के अंदर बढती चेतना और जागरुकता ने पारम्पारिक छवि को तोडा है।

देखा जाये तो साहित्य में नारी की भागीदारी जिस तेजी से हो रही है उसे देखते हुए नारी की अभिव्यक्ती की समर्थक पर हैरान होने वाली कोई बात नहीं रहेगी।

भक्तिकाल में कई कवयित्रीयों का उल्लेख कई कई बार देखने को मिलता है। जैसे कि गंगा गौरी, सीता, सुनिता, शोभा प्रभूता, उमा कृतगढी मनमता, सुचि, सतभामा, जमुना, कोंसी रामा, मृंगा, देवा, देशभक्त, विश्रामा, जुग, जेवा, कीकी, कमला, देवकी, हीरा झाली, हरिचेरी दोषे, भगत कवियुग, युकती जन भक्त राज महिला सब जाने जगत।

आजादी के लढाई के समय जो स्वर साहित्य में उभरा उसमें देश,कालिक परिस्थितीयाँ और देश प्रेम की अभिव्यक्ती साफ लक्षित होती है। महादेवी वर्मा, सरोजिनी नायड, सुभद्रा कुमारी चौहान, उषा देवी मिश्रा आदि कई लेखिकाओं ने अपने समय को अभिव्यक्ती दी और उनके प्रति लिखी गयी कविताएँ या अन्य सशक्त लेखन का योगदान हिंदी साहित्य को प्राप्त हुआ।

नारी साहित्य लेखन एक और स्वतः सुखाय है तो दुसरी और जन हिताय है। नारी साहित्य इस परिवर्तन युग का शुभचिंतक है।

**राजनैतिक क्षेत्र में नारी की भागीदारी :-**

महिलाओं की राजनैतिक भागीदारी बहुत समय से चलती आ रही है। क्योंकि इतिहास में महिलाओं की सक्रिय राजनीती के कई संदर्भ मिलते है।

महिलाओं ने निर्णय लेने की प्रक्रिया में और राजनैतिक और सामाजिक चेतना को बढ़ावा देने में महत्त्वपूर्ण भूमिका निभाई ।

भारतीय महिलाएं अनादि काल से लेकर आर्यो के समय से ही महिलाओं ने समाज में एक महत्त्वपूर्ण भूमिका निभाई है। ऋग्वेद यह भी दर्शाता है कि राजनीती में महिलाओं का स्थान है। इतिहास की बात की जाए तो सत्रहवी शताब्दी में जीजाबाई शहाजी भोसले जिन्हें रानी माँ के रूप में जाना जाता है जिन्होंने बिना प्रत्यक्ष शासन के भी राजनीती को एक नई दिशा दी। १७६६ से १७९५ ई. तक इंदौर की एक संत अहिल्याबाई होळकर अपने कार्यो के लिए प्रसिद्ध थी।

१९५० में जब भारतीय संविधान अधिकारिक तौर पर गठित हुआ, तब भारतीय महिलाओं को वोट देने से लेकर कई बड़े राजनैतिक पदभार सम्भाले हुए है। भारतीय राजनीती में इंदिरा गांधी जिन्हें आयरन लेडी कहाँ जाता है, सोनिया गांधी, ममता बॅनर्जी, मायावती जयललीता, प्रतिभा पाटील, सुषमा स्वराज, शालिनी पाटील, सुप्रिया सुले को महिला नेताओ के रूप में जाना है।

**स्वतंत्रता आंदोलन में नारी की भागीदारी :-**

स्वतंत्रता संग्राम में महिलाओं ने शांतिप्रिय आंदोलनो से लेकर क्रांतिकारी आन्दोलनो तक महत्त्वपूर्ण भूमिका निभाई है।

महिलाओं ने घर का मोर्चा हो या राजनीति कर रणक्षेत्र, महिलाओं ने जिस साहस, सहिष्णुता और वीरता से स्वतंत्रता आंदोलन में अपनी भूमिका निभाइ, वह इतिहास की धरोहर है।

सन् १८५७ का विद्रोह भारतीय स्वतंत्रता संग्राम का पहला ऐसा विस्फोट था जिसकी नायक एक महिला थी जिसने अद्भूत वीरता, पराक्रम और दिलेरी का परिचय दिया। जहाँ स्वयं इंग्रज शासक सर ह्युरोज को झाँसी की रानी लक्ष्मीबाई के अद्भूत वीरता, पराक्रम से चकित होकर कहना पडा कि, "सैनिक विद्रोह के नेताओं में महारानी लक्ष्मीबाई सर्वाधिक बहाद्दूर और सर्वश्रेष्ठ थी।"

"रामगढ की रानीने जहाँ रणक्षेत्र में लढ़ते-लढ़ते प्राण दे दिये।"

स्वतंत्रता आंदोलन में सुचिता कृपलानी का जिक्र आता ही है; जहाँ उन्होंने हर चरण में बढ़-चढ़कर हिस्सा लिया और कई बार जेल जाना पड़ा। इंदिरा गांधी ने सुचेता कृपलानी के बारे में कहाँ था, ऐसा सहस और चरित्र तो स्त्रीत्व को इस कदर ऊँचा उठाता हो, जो महिलाओं में कम ही देखने को मिलता है। स्वतंत्रता आंदोलनों में अरुणा असफ अली कस्तुरबा गांधी, कमला नेहरू, सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित जैसी अनेक नारीयों ने स्वतंत्रता आंदोलन को सक्रीय बनाने में अपना योगदान दिया।

**वैज्ञानिक क्षेत्र में नारी की भागीदारी :-**

विकास के विभिन्न मापदंडो को पूरा करने में भारतीय महिलाओं की अहं भागीदारी है। आज अंतरिक्ष विज्ञान से लेकर रसायन, भौतिक, जैव प्रौद्योगिक, जीव विज्ञान, चिकित्सा, नैनो तकनीक, परमाणू अनुसंधान, पृथ्वी एवं पर्यावरण विज्ञान जैसे क्षेत्रो में भारतीय महिला वैज्ञानिक अपनी छाप छोड़ रही है। कल्पना चावला को भला कौन नहीं जानता?

वह पहली भारतीय अमेरिकी अंतरिक्ष यात्री और अंतरिक्ष में जानेवाली पहली भारतीय महिला थी। उन्होंने पहली बार १९९७ में एक मिशन विशेषज्ञ और प्राथमिक रोबोटिक आर्म ऑपरेटर के रूप में स्पेश शटल कोलंबिया से उड़ान भरी थी।

वर्तमान में भारत की "मिसाईल वुमन" कहीं जाने वाली टेसी थॉमस जो भारत में मिसाईल परियोजना का नेतृत्व करने वाली पहली महिला वैज्ञानिक है। टेसी थॉमस को २०१२ में लाल बहाद्दूर शास्त्री राष्ट्रीय पुरस्कार उन्हें राष्ट्रपतीद्वारा प्रदान किया गया था। यहाँ तक कि रॉकेट वुमन ऑफ इंडिया के नाम से मशहूर रितु करिघल ने मिशन चंद्रयान-२ में मिशन निदेशक के रूप में अहं भूमिका निभाई।

**आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्र में नारी की भागीदारी :-**

विश्व आर्थिक मंच के अनुसार कार्यस्थलों पर महिलाओं को भागीदारी में वृद्धि से कई सामाजिक और आर्थिक लाभ देखने को मिले है।

शिक्षा और रोजगार के अवसरो में वृद्धी से महिलाओं में अपने स्वास्थ्य तथा विकास के प्रति जागरुकता को बढ़ने के साथ अपनी आवश्यकता को पूरा करने की क्षमता में वृद्धि होती है। इस बदलाव का सकारात्मक प्रभाव समाज तथा देश की अर्थव्यवस्था पर भी देखने को मिलती है। भारत में शिक्षा की देवी के रूप में एक महिला ही पूजनीय मानी जाती है।

आज के दौर में सावित्रीबाई फुले को कौन नहीं जानता जिन्होंने महिलाओं के लिए शिक्षा के लिए पुणे में

पाठशाला खोली थी। और आज उनकीही बदौलत देख सकते है कि आज महिलाएँ अलग-अलग क्षेत्रो में काम करके अपने देश का गर्व बढ़ा रही है।

स्वतंत्रता प्राप्ती के बाद महिलाओं की शिक्षा विशेष रूप से उच्च शिक्षा की नई शुरुवात हुई। देश के प्रथम प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू  का कहना था कि आप महिलाओं की स्थिती को देखकर किसी भी राष्ट्र की स्थिती का आकलन कर सकते है। आज हमारी देश की महिलाएँ उच्च शिक्षा के क्षेत्र में आज भारतीय महिलाओं की भागीदारी काफी अधिक है और इसमें उत्तरोत्तर वृद्धि हो रही है।

हमारे देश में गुरू  व माँ का दर्जा एक जैसा है। नारी एक माँ के रूप में राष्ट्र के लिए आदर्श नागरिकों का निर्माण करती है और साथ ही साथ कृषिप्रधान भारत देश में कृषि कार्य में सक्रिय भूमिका अदा करते हुए स्त्रिया अर्थव्यवस्था का आधार रही है।

**निष्कर्ष** :-

राष्ट्र जागरण व इसके नव निर्माण में नारी शक्ती ने त्याग, समर्पण व बलिदान देने में कोई कसर नहीं छोड़ी। गुजरते समय के साथ महिलाओं ने हर स्तर खुद को साबित किया है। समाज में सकारात्मक बदलाव और नई पिढ़ी को राष्ट्र व समाजसेवा के लिए संस्कारित करने में उनका योगदान सबसे ज्यादा है। फिर भी नारी जब आज भी उपेक्षित है। समाज में नारी को पुरुषों के मुकाबले बहुत कम सम्मान और अधिकार प्राप्त है। इस क्षेत्र में सरकार की रणनीतियों के साथ साथ समाज की मानसिकता बदलने की आवश्यकता है। और जब समाज की मानसिकता बदलेगी तब देश की महिलाएँ और भी ज्यादा देश का गौरव बढ़ायेंगी।

"सम्भव ही नहीं किसी राष्ट्र का विकास,
महिलाएँ न दे अगर बराबर का साथ।"

*****

# तृतिय क्रमांक प्राप्त

# राष्ट्रनिर्मितीत स्त्रियांचा सहभाग

**वैशाली चंपतरावजी रेवतकर**
**(बी.ए. भाग ३)**
राणी लक्ष्मीबाई महीला महाविद्यालय, सावरगांव

**मन मंदिरातील मूर्ती तू एक असाधारण देवता**
**अन्नपूर्णा तू, गृहलक्ष्मी तू आणि तूच आहे दुर्गामाता**

भारतीय स्त्री जीवनाचा इतिहास वेदकाळापासून सुरू होतो तर वेदकाळात स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीने होता. तिला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्वातंत्र्य तर होतेच पण स्वतःच्या जोडीदाराच्या निवडीबाबतही पूरेपूर स्वातंत्र्य होते. समाजाकडून ती सुरक्षित होती. कुटुंबात आणि समाजात तिचा विशेष प्रभाव होता. स्त्रीला आपले बौद्धिक आणि आध्यात्मिक जीवन समृद्ध करण्यासाठी शिक्षणाची संधी उपलब्ध होती तर मैत्रेयी, गार्गी ह्या सर्व स्त्रीया बौद्धिक सामर्थ्याच्या किंवा वाक्‌चातुर्याचा आदर्श नमुना होत्या.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री-पुरुष समतेचा आणि सामाजिक न्यायाचा विचार केवळ मांडलाच नाही तर याला कृतीत आणले. त्यांच्या या कार्यात सावित्रीबाई या खांद्याला खांदा लावून सहभागी झाल्या.

१८ व्या शतकात खऱ्या अर्थाने शैक्षणिक सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात स्त्रीचे व्यक्तिमत्त्व उमलू लागले. तिला आपल्या शक्तीची जाणीव होऊ लागली. स्त्रियांमधील सुप्त शक्ती जागृत करण्याची खरी नस जर कोणी पकडली असेल तर ती महात्मा फुल्यांनी. ती नस म्हणजे शिक्षण होय. संपूर्ण सामाजिक बंधनातून स्त्रीला मुक्त करायचे असेल, तिला स्वातंत्र्य बहाल करायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे महात्मा फुल्यांनी ओळखले होते. त्यामुळे इतर स्त्री प्रश्नांना जर महात्मा फुल्यांनी हात घातला असेल तर स्त्री शिक्षण क्रांतीचे अग्रदूत म्हणूनच महात्मा फुल्यांना ओळखले पाहिजे. स्त्री सक्षमीकरणाचे तेच खरे मर्म आहे.

इंदिरा गांधी, विजयालक्ष्मी पंडित, किरण बेदी या महिलांनी पुरुषांच्या तुलनेत सर्वच पुरुषांमध्ये स्वतःला सिद्ध केले आहे. या महिलांनी त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला आणि आपल्या देशाच्या विकासाला अशा कार्यक्षमतेने हातभार लावला. त्यामुळे संपूर्ण समाज त्यांचा अभिमान बाळगू शकला.

आजच्या सुरक्षित आणि आधुनिक महिलांनी त्यांनी जगाला हे दाखवून दिले आहे की ते वैयक्तिक आणि व्यावसायिक क्षेत्रात स्पर्धेत सक्षम आहेत. ते ग्रहकार्य तसेच व्यावसायिक, शैक्षणिक, नोकरशाही आणि राजकारणी दोन्हीतही यशस्वी आहेत. पुरुषांनी स्त्रियांच्या सामर्थ्याची जाणीव ठेवली पाहिजे आणि स्त्रियांनादेखील त्यांच्या शक्तीबद्दल आपल्या कुटुंबासाठी आणि आपल्या राष्ट्रासाठी काय करावे हे लक्षात घेतले पाहिजे.

राणी लक्ष्मीबाई ह्या स्त्रीने दाखवलेल्या धाडसाचे आणि शौर्याचे प्रतीक आहे. सरोजिनी नायडू, सूचेता कृपलानी, विजयालक्ष्मी अशा अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. धैर्य आणि दृढनिश्चयाचे प्रदर्शन स्त्रीच्या लपलेल्या क्षमतेकडे लक्ष देतात.

महिलांचा संयम आणि सभ्यता त्यांना पुरुषांच्या तुलनेत चांगलेच प्रतिस्पर्धी बनवते. मेरी कॉम, सानिया मिर्झा, सायना नेहवाल, सुमित्रा महाजन यांनी आपापल्या क्षेत्रात अलौकिक कर्तृत्व दाखविले.

समाज कल्याण समिती व महिला बालकल्याण समितीमध्ये अधिकांश महिलाच आहेत. मंदाताई मा. मुंडे ह्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती आहेत. जिल्ह्यात एकूण आठ पंचायम समिती आहेत. त्यामध्ये

एकूण जागा १०२ असून ३३ टक्के प्रमाण सर्वच गटातील स्त्रियांना मिळून ३५ स्त्रिया १९९७ च्या निवडणुकीत निर्वाचित झाल्या. ग्रामपंचायतीमध्ये बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसीनुसार दोन स्त्रियांना ग्रामपंचायतीत प्रतिनिधित्व देण्याची तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे १९६१ ते १९८६ या कालखंडात जिल्ह्यात एकूण ४८४ ग्रामपंचायती होत्या. या ग्रामपंचायतीत प्रत्येकी दोन स्त्री प्रतिनिधी याप्रमाणे ९६८ स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळत असे. सर्वच जाती गटातील स्त्रियांकरिता ग्रामपंचायतीत स्त्रियांना ३३ टक्के जागा देण्याची तरतूद करण्यात आली, तेव्हापासून प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कमीत कमी तीन पेक्षा जास्त स्त्रिया प्रतिनिधी म्हणून सहभागी होत आहे.

ह्या स्त्रिया ग्रामपंचायतीत नेमणुकीच्या पद्धतीने नाही तर निवडणूकीच्या माध्यमातून येत आहे. त्यामुळे स्त्रियांच्या राजकीय सक्षमीकरणाच्या प्रक्रियेतील पहिली पायरी म्हणजे निवडणूका होय.

ग्रामपंचायतीतील स्त्री प्रतिनिधींची भूमिका तपासून पाहण्यासाठी गावातील पुरुष प्रतिनिधी व पुरुष कार्यकर्त्यांची सुद्धा मते जाणून घेण्यात आली तेव्हा त्यांच्याकडून असे कळले की, स्त्रिया ह्या पूर्वीसारख्या लाजाळू स्त्रिया राहिल्या नाहीत. त्या प्रत्येक बैठकीला हजर असतात. पुरुषांना घाबरत नाही. त्यांच्या वार्डातील प्रश्न असतील तर त्या बैठकीत मांडतात. माझ्या वार्डातील काम प्रथम झाले पाहिजे यावर वेळप्रसंगी भांडतात. कोणत्याही कागदावर सहजतेने न वाचता स्वाक्षरी करीत नाही. स्त्रियांच्या समोर पुरुषांना अनेकदा माघार घ्यावी लागते. ह्या स्त्रिया पुरुषांच्या दोन हात पुढेच असतात.

अरुणा जगदळे, जयश्री धोटे, ताजुबाई परतेकी, छबुबाई डुरतकर, संगीता आडे, सुनिता नेहारे, सुमन शंभरकर, चंद्रकला निकोडे व मंदा पुसनाके या महिला सदस्यांच्या मुलाखती घेऊन त्यांना गावाच्या विकासाबाबत प्रश्न विचारले. गावात दारू बंदी चळवळ, महिला मंडळ, बचत गटद्वारे स्त्रियांसाठी विविध प्रकारचे कार्यक्रम, प्रशिक्षण, शिबिरे आयोजित केली जातात. अशा कार्यक्रमातून स्त्रियांचे संघटन होते.

कुटुंबातील सदस्यांचेही त्यांना आता सहकार्य मिळत असल्यामुळे कमी उत्पन्न गटातील स्त्रिया राजकारणात मोठ्या संख्येने येत आहे. त्यांचा अनुभव जसजसा वाढत जातो तसतसा त्या राजकारणात सक्रीय होऊन राजकीय दृष्ट्या सक्षम होत आहे. कारण उत्पन्न जरी कमी असेल तरी त्या आता घाबरत नाही. त्यामुळे स्त्रियांची राजकारणातील सक्रियता उत्पन्नावर अवलंबून आहे असे आता म्हणता येत नाही.

कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्यामध्ये स्त्रिया सक्रीय होत आहे. शेतीची कामे, घरकामे, शेतमजुरी, शेतीला पूरक व्यवसाय, दुग्ध व्यवसाय या सर्व कामात पुरुषांबरोबर स्त्रिया काम करतांना दिसतात. त्यामुळे मुलाखती दरम्यान असे दिसून आले की, स्त्रिया घरकामापर्यंत मर्यादित नाही तर त्याचबरोबर कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ करण्याकरिता पूरक व्यवसाय व शेतीची कामे करतात. आपण आपल्या कुटुंबाला हातभार लावला पाहिजे याची जाणीव त्यांच्यामध्ये वाढत आहे. त्यातून स्त्रिया स्वावलंबनाकडे वाटचाल करीत आहे.

आरक्षणानंतर ३३ टक्के स्त्रिया स्थानिक सत्तेत सहभागी होत असल्याचे दिसतात. या स्त्री प्रतिनिधींचा व्यवसाय कोणता आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केल्यावर असे लक्षात आले की, घरकामाबरोबरच स्त्रिया शेती, गृहउद्योग करतात असे दिसून आले. तरीसुद्धा घरकाम करणाऱ्या स्त्री प्रतिनिधींचे प्रमाण जास्त असल्याचे लक्षात आले. ग्रामपंचायतीमध्ये ६७.३२ टक्के स्त्री उत्तरदात्या घरकाम करतात म्हणून सांगितले. सोबतच कुटुंबाला मदत म्हणून छोटे व्यवसाय - जसे विणकाम, शिवणकाम, किराणा दुकान यासारखे हे व्यवसाय सुद्धा करतात.

शेवटी महात्मा फुले यांचे विचार महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, घरामध्ये एक स्त्री जर शिक्षित असेल तर सर्व कुटुंब शिक्षित होते. शिक्षित कुटुंबामुळे समाजाची रचना निकोप बनण्यास मदत होते. निकोप समाजाचे फायदे हे नेहमी राष्ट्र घडविण्यास मदत करतात. शिक्षण व प्रशिक्षणामुहे स्त्रियांची सामाजिक व राजकीय दृष्ट्या सक्षमीकरणाकडे वाटचाल सुरू झाली आहे.

लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपरिषद या निवडणूकीमध्ये मतदानाच्या प्रक्रियेत सहभाग याचा शिक्षणाशी संबंध दर्शविला आहे. शिक्षण आणि मतदानाचे प्रमाण यात

सकारात्मक संबंध आहे. स्त्रियांची मतदानाची टक्केवारी अलीकडे वाढत आहे. मतदान करतांना त्यासंबंधी स्त्रिया स्वतंत्रपणे निर्णय घ्यायला लागल्या आहेत. स्त्रियांमधील राजकीय जाणीव जागृतीमुळे स्त्रिया राजकीयदृष्ट्या सक्षम होत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद मधील समितींच्या कामकाजात स्त्रिया सक्रीय असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. अधिकारी वर्गाने देखील स्त्रिया खूप प्रामाणिकपणे काम करणाऱ्या असून त्यासाठी भरपूर कष्ट घेतात असे सांगितले. एक स्त्री म्हणून समाजात वावरतांना किंवा राजकारणात किंवा प्रशासनात वावरतांना ज्या काही अडचणींचा सामना करावा लागतो निसर्गक्षम आहे.

राष्ट्रनिर्माण कार्यात आणि राजकीय पक्षामध्ये महिलांना समान प्रतिनिधीत्व दिले जाणे आवश्यक आहे. पंचायती राजमध्ये ३३% महिलांचा समावेश झाल्याने खेड्यांमध्ये व शहरांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून आला आहे.

याशिवाय स्त्रीला आपली लपलेली क्षमता समजून घेणे आवश्यक आहे. तिला तिच्या सभोवतालचे अडथळे मोडण्याची गरज आहे. रोल मॉडेलचा शोध घेण्याऐवजी तिला इतरांसाठी रोल मॉडेल बनण्याची गरज आहे. केवळ ती तिच्या लपलेल्या संभाव्यतेची मुक्तता करू शकते. पाळणा हालवणारा हा हात जगावर राज्य करतो यावर तिला विश्वास ठेवण्याची गरज आहे. कोणत्याही कुटुंबात त्या घरातील महिलेची भूमिका ही अतिशय महत्त्वाची असून ती पुढच्या पिढीला सरकारी बनविण्याचे काम महिला करते. एक मुलगी शिकली की पुढे पूर्ण कुटुंबाला शिक्षित करते, त्यातून योग्य समाज व राष्ट्रनिर्मितीचे काम होते. समाजातील महिलांचे कार्य मोठे असून महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रशिक्षण, लघुउद्योग चालना, आर्थिक मदत, शिष्यवृत्ती असे कार्यक्रम राबविले जातात.

महिलांना शिक्षण आर्थिक सक्षम, सुरक्षित करणे ही समाजाची जबाबदारी आहे. त्यांच्या पंखात बळ भरणे हे समाजाचे कर्तव्य आहे. केंद्रीय मंत्रीमंडळातही महिलांची संख्या मोठी असून ते आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद असल्याचे डॉ. भामेर म्हणाले. आमदार सीमा हिरे यांनीही या अधिवेशनाचे कौतुक करत महिला प्रेरणा घेऊन जातील असा विश्वास व्यक्त केला. यावेळी प्रांतीय अध्यक्षा विजय चौधरी, महापौर रंजना आनयी, अग्रनारी प्रांतीय महिला असोसिएशनच्या अध्यक्षा मालती गुप्ता, वीणा अग्रवाल, सपना अग्रवाल आदी उपस्थित होते. यावेळी अग्रप्रेरणा २०१८ या पुस्तकाचे व कॅलेंडरचेही प्रकाशन करण्यात आले.

आजच्या सुशिक्षित आणि आधुनिक महिलांनी त्यांचे प्रतिबंध आणि भीती दूर केली आहे. त्यांनी जगाला हे दाखवून दिले आहे की ते वैयक्तिक आणि व्यावसायिक क्षेत्रात, स्पर्धेत सक्षम आहे. ते गृहकार्य तसेच व्यावसायिक, शैक्षणिक, नोकरशाही आणि राजकारणी दोन्हीही कार्यात यशस्वी आहेत.

देशाचे भवितव्य घडविण्यात महत्त्वाची भूमिका स्त्रीची आहे. मेरी कॉम, सानिया मार्झा, सायना नेहवाल, सुमित्रा महाजन यांनी आपापल्या क्षेत्रात जोरदार हजेरी लावलेली आहे. स्त्रियांनी तर सामाजिक बंधने, भावनिक संबंध, धार्मिक मर्यादा आणि सांस्कृतिक चालीरीतींच्या विरोधात लढा देऊन आयुष्याच्या रणांगणावर उडी घेतली आहे. आज महिलांनी वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती घडवून आणलेली आहे.

राष्ट्रनिर्मितीत महिलांची भूमिका विवेकानंद यांनी सांगितलेली आहे की, स्त्रियांची स्थिती ही सुधारल्याशिवाय जगाच्या हिताची कोणतीही संधी नाही. फक्त एका पंखावर पक्षी उडणे शक्य नाही. त्यामुळे महिलांना समान अधिकार मिळणे गरजेचे आहे. जेथे महिलांचा सन्मान होतो तेथेच देवांचा वास असतो असे शास्त्रामध्ये म्हटलेले आहे. म्हणून राष्ट्रनिर्मितीत स्त्रियांचे योगदान हे फार महत्त्वाचे आहे. तेव्हाच आपल्या देशाचा आणि राष्ट्राचा विकास होऊ लागला.

*****

# तृतिय क्रमांक प्राप्त

## राष्ट्रनिर्मितीत स्त्रियांचा सहभाग

**कु. तृप्ती अर्जुन शिरसाठ**
**डी.एड. प्रथम वर्ष**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय, औरंगाबाद**

कुठेतरी ऐकले होते, जसे शेती फुलवण्यात पावसाचे योगदान असते, भोवतालचा परिसर गंधमय करण्यात फुलांचे योगदान असते, पशुपक्ष्यांची तहान भागवण्यात सरितेचे; तसेच हे सर्वजण स्वतःचे अमूल्य समर्पण दर्शवतात. मात्र त्याची वाच्यता करत नाहीत, तसे राष्ट्रनिर्मितीत तत्कालिन व अर्वाचीन स्त्रियांचे अगदी मोलाचे योगदान आहे. जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी हे महिलांच्या बाबतीत अगदी खरे म्हटले जाते. स्त्रियांच्या इतरही भूमिका असल्या तरी 'जगत्जननी' असा शब्दप्रयोग आपण आवर्जून करतो. संत ज्ञानेश्वरांनी जे पसायदान मागितले त्यास माऊली म्हणून आपण संबोधतो. माता, जननी ही स्त्रीची वैश्विक भूमिकेची अतुलनीय रूपे आहेत. अथर्ववेदात जेव्हा भारतीय महान ऋषिमुनींनी माता भूमिः पुत्रोऽहं पृथ्वीयाः असे संबोधले. म्हणजेच भूमी माझी माता आहे व मी तिचा पुत्र आहे हे संबोधन जेव्हा स्थापित केले तेव्हा संपूर्ण जगभरात स्त्रीचे अमूल्य वैभवाचे महत्त्व स्पष्ट केले गेले. म्हणूनच स्त्रियांना आपल्या संस्कृतीत महत्त्वाचे स्थान आहे.

स्त्रीचे महत्त्व सांगतांना नेपोलियन बोनापार्ट म्हणाले, मला एक योग्य आई द्या, मी तुम्हांला एक योग्य राष्ट्र देईन. मित्रांनो, माता जिजाबाईंना कोण विसरेल ? ज्यांच्या शिक्षणाने, उच्च संस्काराने शिवाजी महाराज महान देशभक्त व कुशल योद्धा बनले, राणी लक्ष्मीबाई, रझिया सुल्तान यांसारख्या अनेकींच्या बलिदानाने बिकट परिस्थिती प्रसिद्धीचा झेंडा रोवला आहे. तर पन्नाघर यांच्या बलिदानाची गाथा, आपल्या स्वतःच्या मुलाचा बळी देऊन राजकुमारीचा प्राण वाचवणे ही काही साधी गोष्ट नव्हे ! विद्यावती, जिचा मुलगा फाशीवर जात असतांना जेव्हा पत्रकारांनी आईच्या डोळ्यात अश्रू पाहून विचारले तेव्हा त्या म्हणाल्या की, मी माझ्या नशिबाला कोसत आहे की मला भगतसिंगसारखा अजून एक पुत्र असता तर देशासाठी तोही बलिदान केला असता. भारतीय मातांचा हा आदर्श होता. अशी त्यांची देशाप्रती निष्ठा होती. प्राचीन युगात सुद्धा महिलांची प्रतिष्ठा आणि उच्च स्थान होते. देवासुराच्या युद्धात कैकैयीने आपल्या अनोख्या युक्तीने महाराज दशरथांचे मन जिंकले. तर तुलसीदासांच्या जीवनात आध्यात्मिक जाणीव करून देताना त्यांच्या पत्नीचा मोलाचा वाटा होता. विदुषीने सुद्धा शंकराचार्य यांसारख्या थोर विद्वानांचा पराभव केला होता.

अगोदरच्या काळात अगदी पाळण्यातही मुलींची लग्नं व्हायची. मुलगी जर दहा-बारा वर्षांची असेल तर कुमारिका असूनही ती घोडनवरीच समजली जायची. मुलींची वये लहान; मात्र नवरे हे तिशी-चाळीशीचे तर कधी साठी तर पासष्टीचेही असत. अवघ्या बाराव्या-तेराव्या वर्षी विधवा होऊन जन्मभर हालअपेष्टा सोसणाऱ्या मुलींची संख्याही कमी नव्हती. त्या काळात वरच्या समजल्या जाणाऱ्या वर्गात विधवांना केशवपनाची सक्ती होती. त्यांनी पुनर्विवाह करणे हेही पाप समजले जाई. एकूणच मुलींचे आणि स्त्रियांचे आयुष्य हजारो बंधनांनी खूप जखडलेले होते. सती जाणाऱ्यांच्या मरणाइतकेच सती न जाणाऱ्या स्त्रियांचे आयुष्य खडतर होते. स्त्रीकडे पाहण्याची समाजाची दृष्टीच भयंकर होती. त्यात निर्दयता व अन्याय भरपूर मोठ्या प्रमाणात असल्याने स्त्रियांना काहीही करण्याची मुभा नव्हती. स्त्रीला शिक्षण नव्हते, स्वातंत्र्य नव्हते. आवड-निवड, इच्छा, मत असे काहीही नव्हते. उपजीविकेचे साधन नाही आणि संमतीही नाही. सार्वजनिक जीवनात स्थान, मान, संधी तर नाहीच. परंतू पदार्पणाची परवानगीही नाही. तरीही जेव्हा स्त्रियांना समान संधी देण्यात आली तेव्हा त्यांनी स्वतःच्या कर्तबगार व

नेतृत्व शैलीने स्वतःला सिद्ध करून दाखवले आहे.

सार्वजनिक जीवनात सर्व क्षेत्रांत तेही आत्मविश्वासाने आणि हिरीरिने पुढे सरसावलेल्या कर्तृत्ववान स्त्रियांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक विकासाला जसा हातभार लावला आहे तसा सांस्कृतिक विकासालाही लावला आहे. जेव्हा शिकणे हेच बाईसाठी पाप मानले जात होते तेव्हा लिहिणे किंवा गाणे किंवा नाचणे यांचा तर विचारच करता येणे शक्य नव्हते. केवळ स्त्रियांना कलेचे दरवाजे बंद होते असे नव्हे, तर प्रत्येक पुरुषांनीही सभ्यता म्हणून गाणे-बजावणे, नाटक करणे निषिद्धच होते. पण, तरीही लोकनिंदेचा स्वीकार करत नंतर हळूहळू स्त्रियांनी तीही क्षेत्रे आपल्या कर्तृत्वाने गाजवली. अर्थात सन्मान राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरच नव्हे तर जागतिक स्तरावरही प्राप्त करणाऱ्या अनेक भारतीय स्त्रिया आहेत. अत्यंत प्रतिकूल अशा सामाजिक, कौटुंबिक अशा परिस्थितीला न जुमानता कधी संघर्ष तर कधी समन्वय करत ज्या स्त्रियांनी विकासाच्या वाटा खुल्या करण्याचा ध्यास घेतला, त्यांच्यामुळेच आज एकविसाव्या शतकातल्या स्त्रियांना राजमार्गावरून चालता येत आहे. त्यांचे धैर्य, त्यांचे शहाणपण, त्यांचा निश्चय, त्यांचे कर्तृत्व आणि त्यांची तळमळ या सर्व गोष्टींचे स्त्रीधन आधुनिक स्त्रीला परंपरेने मिळाले आहे. स्त्रियांचा सहभाग व योगदान फार मोठे ठरले आहे. शिक्षणाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली असे आपण सर्व मानतो. कारण मुंबईत एलफिन्स्टन कॉलेजमधून तयार झालेल्या व काही समाजसुधारक तरुणांनी व उदार इंग्रज अधिकारी यांच्या मदतीने मुलींची पहिली शाळा काढली व त्यापाठोपाठ बहुजन समाजातील मुलींची पहिली शाळा महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुणे येथे पूर्ण देशी शाळा सुरू केली. यात पहिली महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले होत्या. मुलींना शिक्षण देण्यासाठी शिक्षिका बनून ज्ञानार्जन करणे हे राष्ट्राच्या प्रगतीत असणारा सर्वात मोठा वाटा आहे असे मला तरी वाटते. ज्ञानाच्या खऱ्या अद्भूत स्पर्शाने ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाला सुंदर बहर आला अशा त्या स्त्रियांचे दर्शन त्या काळात किती नवलाचे, किती हर्षाचे व रोमांचित करणारे असेल !

राष्ट्राच्या निर्मितीत असंख्य महिलांनी त्यांचे मोलाचे सहभाग व योगदान दिले आहे. इंदिरा गांधी, विजयालक्ष्मी पंडित, किरण बेदी या व अशा अनेक महिलांनी पुरुषांच्या तुलनेत स्वतःला सर्वश्रेष्ठ सिद्ध केले आहे. या सर्व आजच्या सुशिक्षित आणि आधुनिक महिलांनी त्यांचे सर्व प्रतिबंध आणि भीती दूर केली आहे. त्यांनी जगाला हे दाखवून दिले आहे की त्या वैयक्तिक आणि व्यावसायिक क्षेत्रात सक्षम आहेत. तसेच व्यावसायिक, शैक्षणिक, नोकरशाही आणि राजकारण या सर्वात अग्रेसर बनल्या आहेत. पुरुषांनी स्त्रियांच्या या सामर्थ्याची जाणीव केली आहे. आजच्या युगात पुरुषही स्त्रियांना बरोबरीने वागवत आहेत. परंतु याला काही ठिकाणी अपवादही आहेत. प्रत्येक स्त्रीने स्वतःमधील सुप्त गुणांचा, शक्तींचा पाठपुरावा करायला हवा. या गुणांना वाव द्यायला हवा. जेणेकरून राष्ट्राच्या उन्नतीमध्ये, निर्मितीमध्ये खारीचा का होईना वाटा असेल. कारण जर स्त्रीने ठरवले तर सर्वकाही होते.

आता, स्वातंत्र्य चळवळीचा कालावधी जर पाहिला तर आपल्याला दिसून येते की, स्त्रिया प्रेमाच्या आव्हानाला बंडखोरीचे रूपांतर देऊ शकतात आणि राष्ट्रीयतेला उत्तेजन देऊ शकतात व राष्ट्रीयतेची ज्योत अखंडित ठेवण्यासाठी ती तिचे सर्वकाही समर्पित करू शकते. मॅडम भिकाजी कामा, राणी लक्ष्मीबाई, सरोजिनी नायडू, अरुणा असफ अली, ॲनी बेझंट, कॅप्टन लक्ष्मी, सुचेता कृपलानी, भगिनी निवेदिता अशा अनेक स्त्रिया आहेत ज्या भारतीय क्रांतिकारकांना पाठिंबा देण्यात अग्रेसर होत्या. इतिहास साक्ष आहे की, जेव्हा जेव्हा समाज व राष्ट्राने स्त्रियांना संधी व हक्क दिलेले आहेत तेव्हा स्त्रियांनी जगासमोर सर्वोत्तम व उत्कृष्ठ उदाहरणे सादर केलेले आहेत. आता आधुनिक काळात महादेवी वर्मा, सुभद्रा कुमारी चौहान, महाश्वेतादेवी, अमृता प्रीतम, दुर्गा बावी इत्यादी महिलांनी साहित्य व देशाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. तर कलाक्षेत्रात देविकाराणी, लता मंगेशकर, वैजयंती माला, सोनल मानसिंह आदीचे योगदान खरोखर कौतुकास्पद आहेत तरकल्पना चावला, मदर तेरेसा, सानिया मिर्झा, सायना नेहवाल अशा अनेकजणी विविध क्षेत्रात त्यांच्या सर्वोत्तम

कामगिरीने अनेकांच्या प्रेरणास्थान बनल्या आहेत. तर शीला डावरे ही १९८८ साली भारतीय पहिली महिला रिक्षाचालक बनली आहे.

अगोदरच्या काळात स्त्रीला संरक्षण सेवा मध्ये योग्य मानले जात नव्हते. परंतू भारताची पहिली महिला आय.पी.एस. अधिकारी श्रीमती किरण बेदी यांची निर्भिड व कर्तबगार शैली बघून मन भारावून जाते. मित्रांनो ती स्त्री आहे म्हणून राष्ट्राचे वैभव प्रफुल्लित आहे. ती एक माता आहे म्हणून मातृत्वाचा गौरव होतो. ती गृहिणी आहे म्हणून परिवार अन्नपूर्णेच्या आशीर्वादाने संपन्न आहे. मुलांच्या आयुष्यात ती पहिली शिक्षिका आहे म्हणून गुरुंमध्ये तिला सर्वोच्च स्थान आहे आणि ती स्वयंसिद्ध आहे म्हणून तिचे राष्ट्रनिर्मितीत अमूल्य असा सहभाग व योगदान आहे. आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवित आहेत. त्या पुरुषांइतक्याच सक्षम आहेत. सर्व क्षेत्रात महिलांची उपस्थिती, क्षमता व कर्तृत्व हेच त्यांची खरी ओळख पटवून देत आहेत. राष्ट्रनिर्मितीमध्ये स्त्रिया आई, बहिण, गृहिणी, अधिकारी, कर्मचारी, शिक्षिका यांसारख्या भूमिका निभावून राष्ट्राला उन्नतीकडे नेत आहेत.

अलीकडेच राज्यस्तरीय अधिवेशन पार पडले. त्यात केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. मामरे यांनी महिलांच्या शिक्षण व राष्ट्राला एकत्रित आणून, जोडून, ठेवण्याच्या भावनेला पाठिंबा दिला आहे. ते म्हणतात की, कोणत्याही कुटुंबात त्या घरातील महिलेची भूमिका ही अतिशय महत्त्वाची असून ती पुढच्या पिढीला संस्कारी बनविण्याचे काम महिला करत असते. तरी अद्यापही त्यांच्याबाबत दुजाभाव केला जात आहे. स्त्रीभृणहत्यांमुळे आजच्या काळात स्त्री-पुरुष लिंगदरात खूप तफावत निर्माण झाली असून हे भविष्यासाठी धोकादायक आहे. एक मुलगी शिकली की पुढे पूर्ण कुटुंबाला शिक्षित करते, त्यातून योग्य समाज व राष्ट्रनिर्मितीचे कार्य होते. महिलांना शिक्षण आर्थिक सक्षम, सुरक्षित करणे ही समाजाची जबाबदारी आहे. त्यांच्या पंखात बळ भरणे हे समाजाचे कर्तव्य आहे. केंद्रीय मंत्रीमंडळातही महिलांची संख्या मोठी असून ते आपल्या सर्वांसाठीच अभिमानास्पद असल्याचे आहे. त्यांची प्रेरणा घेण्याचे आव्हान आपण केले होते.

बँकॉक येथील आशियाच्या यु.एन.च्या एस्कॅप या कार्यालयाने महिला विकासाच्या वाटचालीबाबतची माहिती जमा केली. स्त्रियांची खूप प्रगती झालीय किंवा मग स्त्रियांचे प्रश्न आता फार सोपे झालेत अशा सरधोपट विधानांची वस्तुस्थिती समजायला या अहवालाचा एपयोग होतो. महिलांवरील अत्याचार, शिक्षणातील गळती, युद्धे, पर्यावरण बदल, महिला विकासासाठी निधीची व्यवस्था, या सर्वांसोबतच गेल्या काही वर्षात संयुक्त राष्ट्रसंघातच अंतर्गत बदलावर काही बरीचशी वादावादी झाली आहे. महिला विकासावर दावा केला जातो. परंतू स्त्रियांचे प्रश्न समजून न घेताच जेव्हा सरकार निर्णय घेतात, तेव्हा जर स्त्रियांच्या विकासाबाबत कोणता योग्य दृष्टिकोन असावा, काय कार्यपद्धती असावी, असा प्रश्न तयार होतो. त्यातूनच गीअर नावाची एक मोहिम ८० देशांतून स्त्री-संघटनांनी राबवली होती. मुख्यतः विकास करतांना सर्व स्त्रियांची परिस्थिती एकच आहे असे गृहित धरू नका तर सर्वांच्या दृष्टिने त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करायला हवा. नाहीतर, युएनडीपीसारख्या मोठ्या प्रवाहात सर्वांना सामील करण्यात छोटे, स्वयंपूर्ण, पण परिणामकारक प्रयोग नष्ट होतील. भारत ब्रिटीशांच्या तावडीतून मुक्त होण्यासाठी धडपडत असतांना, महिलांनी जबाबदारी घेण्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यात राणी लक्ष्मीबाई ह्या स्त्रीने दाखवलेल्या धाडसाचे आणि धैर्याचे प्रतीक आहे. सरोजिनी नायडू, सूचेता कृपलानी, विजयालक्ष्मी अशा अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावून राष्ट्रनिर्मितीत उत्स्फूर्त सहभाग दिला. अलीकडेच, भारताने पहिल्या तीन-तीन महिला हवाई दलाचे पायलट नियुक्त केल्या जे देशाचे महिलेने मिळविलेले आणखी एक मैलाचा दगड आहे. राष्ट्रनिर्मितीत महिलांची भूमिका स्पष्ट करतांना विवेकानंद म्हणतात की, स्त्रियांची स्थिती ही सुधारल्याशिवाय जगाच्या हिताची कोणतीही संधी नाही. फक्त एका पंखावर पक्षी उडणे शक्य नाही. महिलांनी आपल्या सामर्थ्याचा उपयोग करणे आवश्यक आहे आणि महिलांना समान संधी व समान अधिकार मिळणे गरजेचे आहे. म्हणून राष्ट्रनिर्मितीत स्वातंत्र्यपूर्व व आधुनिक भारतातील स्त्रियांची भूमिका आणि सहभाग अतुलनीय व अभूतपूर्व आहे असे म्हणता येईल.

*****